**अहवाल क्रमांक : १८३**

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

**(२०२०-२०२१)**

**(चौदावी महाराष्ट्र विधानसभा)**

**कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

# चौथा अहवाल

**(सदर अहवाल दिनांक मार्च, २०२१ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**


महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई

२०२१

एचबी २४७८.

# पंचायती राज समिती

**(२०२०-२०२१)**

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

## चौथा अहवाल

## पंचायती राज समिती

(सन २०२०-२०२१)

**समिती प्रमुख**

१ श्री. संजय रायमुलकर, वि.स.स तथा समिती प्रमुख,

**सदस्य**

२ श्री. प्रदिप शिवनारायण जैस्वाल, वि.स.स
३ श्री. कैलास बाळासाहेब पाटील (घाडगे) वि.स.स,
४ डॉ. राहूल वेदप्रकाश पाटील वि.स.स.
५ श्री. अनिल भाईदास पाटील, वि.स.स.
६ श्री. संग्राम अरूणकाका जगताप, वि.स.स.
७ श्री. दिलीपराव शंकरराव बनकर, वि.स.स.
८ श्री. शेखर गोविंदराव निकम, वि.स.स.
९ श्री. सुभाष रामचंद्रराव धोटे, वि.स.स.
१० श्री. माधवराव निवृत्तीराव जवळगावकर, वि.स.स.
११ श्रीमती प्रतिभा सुरेश धानोरकर, वि.स.स.
१२ श्री. हरीभाऊ किसनराव बागडे, वि.स.स.
१३ डॉ. विजयकुमार कृष्णराव गावीत, वि.स.स.
१४ डॉ. देवराव मादगुजी होळी, वि.स.स.
१५ श्री. कृष्णा धमाजी गजबे, वि.स.स.
१६ डॉ. संजय श्रीराम कुटे, वि.स.स.
१७ श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स.
१८ श्री. प्रशांत बंसीलाल बंब, वि.स.स.
१९ श्रीमती मेघना दिपक बोर्डिकर-साकोरे, वि.स.स.
२० श्री. किशोर गजानन जोरगेवार , वि.स.स.
२१ श्री. अंबादास दानवे, वि.प.स.
२२ श्री. विक्रम काळे, वि.प.स.
२३ श्री. अमरनाथ राजुरकर, वि.प.स.
२४ श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.
२५ श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित** :

२६ श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.
२७ श्री. जयंत पाटील, वि.प.स.
२८ श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
२९ श्री. किशोर दराडे, वि.प.स.
३० श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेंद्र भागवत, सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)
(४) श्री. ह. वि.तामोरे, कक्ष अधिकारी
(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिती
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.
(६) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(८) *** रिक्त
(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.
(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
(२२) *** रिक्त
(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.
(२९) * श्री. किशोर दराडे, वि.प.स.
(३०) ** श्री. निलय नाईक, वि.प.स.
(३१) ** श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)
(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(५) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

***** श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

****** श्री. निलय नाईक, वि.प.स. व श्री. निरंजन डावखरे, वि.प. स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च, २०११ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

****** डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा चौथा अहवाल सादर करीत आहे.

सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता समिती दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पध्दतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला " Mini Legislature " सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पध्दतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दिष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पध्दतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपध्दतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पध्दतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुध्द कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१३-१४ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१४-१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठीत झालेल्या समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेस दिनांक ५, ६ व ७ सप्टेंबर, २०१८ रोजी भेट देऊन श्री. अमन मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-१८ या वर्षाकरिता गठीत झालेल्या समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २४ जुलै, २०१९ व दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी जिल्हा परिषद, कोल्हापूर संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग, श्री. अनिल डिग्गीकर, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, श्री. पी. के. मिराजे, सहायक सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई, श्री. म. र. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, डॉ. विजय भुंदेवाड, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई, श्री. भा. ज. गाडेकर, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग, डॉ. वसंत माने, अवर सचिव, ग्रामविकास, डॉ. एस. व्ही. गायकवाड, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. शरद यादव, कार्यासन अधिकारी, ग्रामविकास विभाग, श्री. र. पु. इंगोले, कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, श्री. अ.म. पिंपरकर, श. श्रे. १ पर्यावरण विभाग, श्री. अमन मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. रविकांत अडसुळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.), श्री. राजेंद्र भालेराव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), श्री. सोमनाथ रसाळ, महिला व बालविकास अधिकारी, श्रीमती आशा उबाळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), श्री. मनिष पवार, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, डॉ. वाय. आर. साळे, जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. विनोद पवार, पशुसंवर्धन अधिकारी, श्री. समीर व्याघ्रांबरे, प्र. उद्यान अधिकारी यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२०-२०२१ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक ३ मार्च, २०२१ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ३ मार्च २०२१.

**संजय रायमुलकर**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| (१) | एक | कोल्हापूर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसमवेत अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींसंदर्भात. | १ |
| (२) | दोन | कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात ग्रामसेवक, तलाठी, शिक्षक व कृषि अधिकारी मुख्यालयी राहत नसल्याबाबत. | ६ |
| (३) | तीन | गडहिंग्लज पंचायत समिती अंतर्गत १६ पशुवैद्यकिय दवाखान्यामधील रिक्त पदे भरण्याबाबत. | ९ |
| (४) | चार | आजरा पंचायत समिती अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिका-यांची पदे भरण्याबाबत. | १२ |
| (५) | पाच | कोल्हापूर जिल्हा परिषद गैरव्यवहार व अफरातफरीच्या प्रकरणांबाबत. | १४ |

**परिशिष्ट**

**समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त**

## प्रकरण एक

## जिल्हा परिषद, कोल्हापूर (प्रशासन)

## कोल्हापूर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसमवेत अनौपचारिक चर्चेच्यावेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबीसंदर्भात

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत कोल्हापूर जिल्हा परिषदेस भेट देऊन जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसमवेत अनौपचारिक चर्चा केली. सन २०१४-१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील अनौपचारिक चर्चेच्यावेळी अध्यक्ष, जिल्हा परिषद, यांनी विषद केले की, ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयामध्ये शिथिलता मिळण्यासाठी मागणी केली आहे. शहरातील गटारांमधील सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. सध्या कोल्हापूर शहरालगत असलेल्या पंचगंगा नदीमधील प्रर्दुषणाचा अभ्यास करीत आहोत. जिल्ह्यात स्वच्छता अभियान राबवित आहोत. या कामी थोडीशी लवचिकता (फ्लेक्झीबिलीटी) मिळावी म्हणून प्रत्येक गावासाठी २० लाख रुपयांची तरतूद आहे. पण यामध्ये अशी तरतूद आहे की, हा निधी ठराविक बाबींवरच खर्च करावा इतर बाबतीत शिथिलता नाही. प्रत्येक गावाची भौगोलिक परिस्थिती वेगवेगळी असते. त्यामुळे प्रत्येक गावामध्ये तोच प्रकल्प राबविता येईल अशी परिस्थिती नाही. त्यामुळे त्या गावासाठी दिलेला २० लाख रुपयांचा निधी तसाच शिल्लक राहतो. यावर समितीने काय सुधारणा करता येईल याबाबत विचारणा केली असता, अध्यक्ष, यांनी समितीस विशद केले की, जुने प्रकल्प कालबाह्य झालेले आहेत, तसेच नवीन प्रकल्पांसाठी गावांमध्ये जागा सुद्धा उपलब्ध नसते. त्यामुळे त्याच बजेटमध्ये दुसरे चांगले प्रकल्प म्हणजे गावामध्ये कमी कचरा कसा होईल किंवा झालेल्या कच-यापासून खत निर्मिती कशी करता येईल अशा प्रकारचे प्रकल्प दिले तर बरे होईल. थोडक्यात त्या गावाची भौगोलिक स्थिती पाहून उपलब्ध २० लाख रुपयांमध्ये त्या घनकच-याचे व्यवस्थापन कसे करायचे हे ठरविले पाहिजे. त्यामुळे काही ठिकाणी या निधीमध्ये वाढ करून ४० लाख रुपयांची मर्यादा करू शकता. कारण या बाबतीत सुधारणा हवी आहे. यावर समितीने विचारणा केली की, गावामध्ये प्रदुषित पाणी येऊ नये ही संपूर्ण जबाबदारी त्या गावाची आहे. कारण आपण आता म्हटले आहे की आपल्याला सुधारणा करावयाची असून त्या दृष्टीने नवनवीन प्रकल्प येणे अपेक्षित आहे. यावर अध्यक्ष, यांनी समितीस विशद केले की, आता ते सांडपाणी फिल्टर करून नद्यांमध्ये सोडू शकतो किंवा शेतात सुद्धा सोडू शकतो. मात्र ते पाणी फिल्टर होणे आवश्यक आहे.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात आधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.

कोल्हापूर शहरातील गटारांमधील सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन तसेच पंचगंगा नदी प्रदुषण मुक्त करणे व जिल्ह्यात स्वच्छता अभियान राबविण्यासाठी ग्रामविकास विभागाने प्रत्येक गावासाठी २० लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. मात्र सदर निधी ठराविक बाबीवरच खर्च करावा अशी त्यात असलेली तरतूद शिथिल करण्याबाबत ग्रामस्थांची मागणी आहे. प्रत्येक गावांची भौगोलीक परिस्थिती वेगवेगळी असल्यामुळे काही ठिकाणी निधीमध्ये रुपये ४० लाख वाढ करण्यासंदर्भात तसेच घनकचरा व्यवस्थापन व नमामी पंचगंगा कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.

उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

१. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) ही केंद्र पुरस्कृत योजना असून त्यास केंद्र सरकारकडून ६० टक्के व राज्य सरकारकडून ४० टक्के हिस्सा दिला जातो. त्यानुसार घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प मंजूर केले जातात. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासन निर्णय क्र.निर्मल २०१२/प्र.क्र.२७३/पापु-१६ दिनांक २१ ऑगस्ट, २०१३ अन्वये खालीलप्रमाणे विहीत केलेल्या सार्वजनिक घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन बाबीवर खर्च करण्यासाठी ५०० पेक्षा जास्त कुटूंब संख्या असलेल्या ग्रामपंचायतीसाठी रक्कम रुपये २०.०० लाख तरतूद अनुज्ञेय आहे.

(अ) सांडपाणी व्यवस्थापनसाठी अनुज्ञेय बाबी.

१. सार्वजनिक पाझर खड्डा, २. सांडपाणी स्थिरीकरण तळे, ३. वृक्षरोपण.

(ब) घनकचरा व्यवस्थापन साठी अनुज्ञेय बाबी.

१. खतखड्डा २. बांधीव खड्डा ३. नाडेप खत टाकी (लहान/मोठी) ४. गांडूळ खत टाकी ५. शास्त्रोक्त पद्धतीने भूमी भराव.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडील शासन निर्णयानुसार कामकाज करीत असताना येणा-या अडचणी व जागा उपलब्धतेच्या अनुषंगाने शासन निर्णयात परिस्थितीनुरुप सुधारणा करणेबाबत जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून दिनांक १९ डिसेंबर, २०१८ च्या पत्रान्वये सादर केलेल्या अभिप्रायानुसार पुढीलप्रमाणे बाबी सुचविण्यात आलेल्या आहेत.

५०० पेक्षा जास्त कुटूंब संख्या असलेल्या ग्रामपंचायतीसाठी रक्कम रुपये ३०.०० लाख अनुदान अनुज्ञेय करण्याबाबत व त्यामध्ये प्रतिवर्ष ५ टक्के किंवा ५०,०००/- रु. वाढ करणेबाबत संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग मुंबई यांना कळविलेले आहे.

घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनासाठी कमी जागा लागणारे अद्ययावत व अत्याधुनिक तंत्रज्ञान निश्चित करणेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती नेमणे तसेच रक्कम रुपये ५० लाखापर्यंतचे तंत्रज्ञान निश्चित करण्याचे अधिकार देणेबाबत शासनास अभिप्राय सादर केलेला आहे.

२. पंचगंगा नदी प्रदूषण पहिल्या टप्प्यातील ३० गावांचा सांडपाणी व ३८ गावांचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प आराखडा रक्कम रुपये ९४.५० कोटी दिनांक १ जून, २०१७ अन्वये मा.प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर केलेला आहे.

३. नमामि पंचगंगा कार्यक्रमासाठी पंचगंगा नदी प्रदुषणास कारणीभूत ठरणा-या ३६ पैकी ११ ग्रामपंचायती मधील सांडपाणी व्यवस्थापनासाठी Tiger Bio Filter तंत्रज्ञानावर आधारीत रक्कम रुपये २७.०७ कोटीचा प्रकल्प आराखडा दिनांक २६ ऑक्टोबर २०१८ रोजी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांचे शिफारशींसह पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन यांना पाठविण्यासाठी सादर करण्यात आलेला आहे.

४. जिल्हा परिषद स्वनिधीतून पंचगंगा नदी प्रदुषणात समाविष्ट असणा-या ग्रामपंचायतींचे सांडपाणी नदीत मिसळण्यापासून रोखण्यासाठी नाला खोलीकरण व नाल्यावर साखळी वनराई बंधारे घालणेसाठी ६ ग्रामपंचायतीसाठी रक्कम रुपये २५ लाख रुपयांची तरतूद सन २०१९-२० वर्षात करण्यात आलेली आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**पर्यावरण विभागाचे अभिप्राय.—** पंचगंगा नदी प्रदुषण अनुषंगाने पर्यावरण विभागाची माहितीः- कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रामधून एकूण ९६ एमएलडी सांडपाण्याची निर्मिती होते. त्यावर प्रक्रिया करण्याकरिता २ सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा असून त्याची एकूण क्षमता ९३ एमएलडी आहे. तथापि, अपु-या ड्रेनेज नेटवर्कमुळे ७२ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येत असून उर्वरित २४ एमएलडी पाणी विनाप्रक्रिया नदीत सोडले जाते. कसबा बावडा व दुधाळी येथे ४ व ६ द.ल.ली. क्षमतेचे प्रस्तावित घरगुती सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याचे काम कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत प्रगतीपथावर असून मार्च, २०२० पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रामधून विनाप्रक्रिया पंचगंगा नदीमध्ये सोडण्यात येणा-या सांडपाण्यामुळे होणा-या नदी प्रदुषणाबाबत कोल्हापूर महानगरपालिकेविरुद्ध महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने ४ फौजदारी खटले दाखल केलेले असून एकूण रुपये २१ लाखाची बँक हमी जप्त केली आहे. तसेच कोल्हापूर महानगरपालिकेस प्रतिदिन रुपये २.६ लक्ष इतकी रक्कम रेमिडीएशन/प्रदुषण नियंत्रण या कामासाठी स्वतंत्र खात्यात जमा करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिनांक २५ एप्रिल, २०१९, रोजी दिले होते. त्यानुसार कोल्हापूर महानगरपालिकेने स्वतंत्र खाते निर्माण करून रुपये ८०,६०,०००/- एवढी रक्कम खात्यात जमा केली आहे. कोल्हापूर महानगरपालिकेविरुद्ध पंचगंगा नदी प्रदुषणा संदर्भात मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. १८३/२०१२ दाखल केली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

कोल्हापूर जिल्हा परिषद क्षेत्रामधील एकूण १७४ ग्रामपंचायतीमधून एकूण २३ एमएलडी सांडपाण्याची निर्मिती होते. सदर पाणी विनाप्रक्रिया नदीत सोडले जाते. ग्रामपंचायतीमधून निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया यंत्रणा उभारण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची असल्यामुळे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत जिल्हा परिषदेला अनेकवेळा सूचित केलेले आहे.

जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी पंचगंगा खो-यातील १७३ गावांपैकी पहिल्या टप्प्यातील ३९ गावांच्या सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाचा रु. १०८.९३ कोटी रकमेचा प्रस्ताव पर्यावरण विभागास सादर केला होता. सदर प्रस्ताव दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय, केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल, दिल्ली यांचेकडे पाठविण्यात आलेला होता. तथापि, केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने मर्यादित निधी अभावी फक्त शहरी भागाकरिता अतिप्रदुषणांचे प्रस्ताव हाती घेणे येत असलेने सदर मुळ प्रस्ताव कोल्हापूर जिल्हा परिषदेकडे परत पाठविण्यात आला होता.

तद्नंतर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी पुन्हा पंचगंगा प्रदुषण निर्मूलनासाठी जिल्हा परिषदेतंर्गत पहिल्या टप्प्यातील ३१ गावांचा सांडपाणी व ३८ गावांचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवाल मंजुरीबाबत पत्र पर्यावरण विभागास दिनांक ०१ जून, २०१७ रोजी प्राप्त झाले होते. तथापि, सदर पत्रासोबत प्रकल्प अहवाल व प्रेझेंटेशन प्राप्त झाले नसल्याने दिनांक १५ जून, २०१७ व दिनांक १९ जुलै, २०१९ रोजीच्या स्मरणपत्रान्वये प्रकल्प अहवाल व प्रेझेंटेशन सादर करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सुधारित प्रस्ताव अद्यापही या विभागास अप्राप्त आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून जिल्हा परिषदेतंर्गत पहिल्या टप्प्यातील ३१ गावांचा सांडपाणी व ३८ गावांचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे सादरीकरण पर्यावरण विभागास प्राप्त झाले होते. पर्यावरण विभागामार्फत राज्य नदी संवर्धन योजनेतंर्गत प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने रुपये ३८०० कोटी निधी उपलब्ध करून देणेबाबत मा.मंत्री (वित्त) व निती आयोग, दिल्ली यांना अनुक्रमे दिनांक १७ जून, २०१९ व दिनांक २८ जून, २०१९ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे. त्यामध्ये पंचगंगा प्रदुषण निर्मुलनासाठी जिल्हा परिषदेतंर्गत पहिल्या टप्प्यातील ३१ गावांचा सांडपाणी व ३८ गावांचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी रु. १०८ कोटी रुपये मिळणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडून प्राप्त सादरीकरणाचा समावेश आहे.

**नगर विकास विभागाचे अभिप्राय :-** कोल्हापूर शहरातील गटारातील सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन तसेच पंचगंगा नदी प्रदुषण मुक्त करणे याबाबतची माहिती कायमस्वरुपी उपाययोजना.

- कसबा बावडा येथे ७६ द.ल.ली.क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र बांधणे व इतर अनुषंगिक कामे
- जयंती नाला येथील पंपीग स्टेशनचे अपग्रेडेशन
- लाईन बाझार नाला येथील पंपीग स्टेशन
- बापट कॅम्प नाला येथील पंपीग स्टेशन
- दुधाळी येथे १७ द.ल.ली. क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणे व इतर अनुषंगिक कामे-
- अमृत अभियान अंतर्गत मंजूर कोल्हापूर शहर मलनिःसारण प्रकल्प
- काही योजनाद्वारे विहीत कालावधीमध्ये पंचगंगा नदी प्रदुषण पूर्णपणे रोखणेकामी कोल्हापूर महानगरपालिकेस यश प्राप्त झाले आहे.

**तात्पुरत्या उपाययोजना**

लहान नाल्यामुळे होणारे पंचगंगा नदी प्रदुषण रोखणेसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करणेत येत आहेत.

- शिंदे व राबाडे विहीर उपसा योजना, शेती व गवती रानास सांडपाणी देणे.
- दगडी बंधारे घालून पाणी अडविणे/फिल्टर करणे, निर्जतुकीकरणासाठी ब्लीचींग पावडरचा डोस देणे.

**सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे अभिप्राय -** अप्राप्त

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय -** जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, समिती कोल्हापूर शहरातील गटारांमधील सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन तसेच पंचगंगा नदी प्रदूषणमुक्त करण्यासंदर्भात जिल्ह्यात स्वच्छता अभियान राबविण्यासाठी ग्रामविकास विभागाने प्रत्येक गावासाठी २० लाख रुपयांची तरतूद केली आहे. मात्र सदर निधी ठराविक बाबीवरच खर्च करावा, अशी त्यात असलेली तरतूद शिथिल करण्याबाबत ग्रामस्थांची मागणी आहे. विभागाची या संदर्भातील भूमिका काय आहे. यावर प्रधान सचिव,पर्यावरण विभाग यांनी समितीस विशद केले की, सदर विषयाच्या संदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कार्यवाही केली आहे.

तद्नंतर सहायक सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई यांनी समितीस सदर विषयाबाबत विशद केले की, कोल्हापूरमध्ये ९६ एमएलडी सांडपाण्याची निर्मिती होते, त्यापैकी ७५ टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया (ट्रीटमेंट) केली जाते, उर्वरित २५ टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया (ट्रीटमेंट) करण्यासाठी महानगरपालिकेस माहे मार्च, २०२० पर्यंतचा वेळ दिला आहे. प्रक्रिया (ट्रीट )केलेले सांडपाणी शेतीसाठी वापरले जाते आणि काही पंचगंगेमध्ये सोडले जाते. इचलकरंजी येथे एमएसडब्ल्यू म्हणजे म्युनिसिपल सॉलिड वेस्ट ट्रीट केले जाते. जवळपास ७० मेट्रिक टनाचे आरडीएस बनविले जाते. तसेच जवळपास ३० टनाचा बायोगॅस प्लँट आहे. उर्वरित घनकचरा लॅण्ड फिलिंगसाठी वापरला जातो. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने महानगरपालिकेवर कारवाई केली आहे, खटला दाखल केला आहे. आपण या संदर्भातील आराखडा बनवून केंद्र सरकारकडे पाठविला आहे. एनजीटीमध्ये त्याचे सबमिशन झाले आहे. समितीने कोल्हापूरला पर्यावरणाच्या संदर्भात समिती समोर एक सादरीकरण करण्यात आलेले होते; त्यासंदर्भात समितीने विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, कोल्हापूरचे सांडपाणी ४ भागांत विभागले आहे. एक भाग महानगरपालिकेचा आहे, त्यांचा मार्च, २०२० पर्यंत एसटीपी होईल. दुसरा भाग जिल्हा परिषदेचा आहे. त्यासाठी

१०८ कोटी रुपयांचा आराखडा पर्यावरण खात्याकडे पाठविला आहे, तो त्यांनी मान्यतेसाठी निती आयोगाकडे पाठविला आहे. त्या संदर्भात दोन बैठकाही झाल्या होत्या. त्या संदर्भात सादरीकरण केले होते. यावर समितीने विचारणा केली की, सांडपाणी व्यवस्थापन १४ व्या वित्त आयोगातून करू शकत नाही का. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, ते यामधून होऊ शकत नाही. कारण यासाठी लागणारा निधी जास्त असतो. १०८ कोटी रुपयांचा आराखडा ३९ गावांसाठी आहे. एका गावासाठी दोनशे ते अडीचशे कोटी रुपयांचा निधी लागतो. त्यामुळे ते शक्य नाही. पुढे समितीने विचारणा केली की, प्रदुषणाच्या संदर्भातील हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे का. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, ते प्रकरण एनजीटीमध्ये आहे तसेच न्यायप्रविष्ठ आहे. ते सकारात्मक करून केंद्र सरकारकडे पाठविले आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठीचा निधी २० लाख प्रती गाव लोकसंख्येनुसार मंजूर होतो. मात्र त्यावर स्टे होता. आता त्या संदर्भात १९ जुलै, २०१९ रोजी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचा शासन निर्णय आला आहे. त्यामध्ये त्यांनी २० लाख प्रती गाव मान्य केले आहे. महाराष्ट्र शासन त्यांचा निधी देणार आहे.

समितीने विचारणा केली की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ पर्यावरण विभागांतर्गत काम करते. त्या मंडळाचा एक अधिकारी जिल्हा स्तरावर असतो. यावर सहाय्यक (तांत्रिक), महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई यांनी समितीस विशद केले की, संपूर्ण महाराष्ट्रात रिजनल ऑफिसर असतात. नदीला प्रदुषित करणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासंबंधी संबंधित ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका यांची जबाबदारी असताना खराब पाणी ते नदीत सोडतात. त्यासाठी संबंधितांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई का करीत नाही ? ते ब-याच वेळा प्रमाणपत्रे मागतात. गिट्टी खदानीची परवानगी देताना अमुक इतकी झाडे लावू, इतका रस्ता करू, असे सर्व खोटेच सांगतात. यावर समितीने विचारणा केली असता, सहाय्यक (तांत्रिक), महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई यांनी समितीस विशद केले की, कोल्हापूर महानगरपालिकेवर ४ वेळा खटले दाखल केले आहेत.

यावर, ग्रामपंचायतीवर खटले दाखल केले आहेत का? कोल्हापूर महानगरपालिकेला वेगळा न्याय, कारण ती स्थानिक स्वराज्य संस्था आहे, मग ग्रामपंचायत स्थानिक स्वराज्य संस्था नाही का? ग्रामपंचायती नदीत खराब पाणी सोडत असतील तर त्यांच्यावरही कारवाई करावी. टेबल, खुर्ची नव्याने घेत आहेत. १४ व्या वित्त आयोगातून २५ हजारांची एक खुर्ची खरेदी करीत आहेत. अशी समितीने विचारणा केली असता, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस विशद केले की, ग्रामीण भागात जिल्हा परिषदेची जबाबदारी आहे. पर्यावरण विभाग फक्त शहरी भागातील कारवाई करतो.

समितीने विचारणा केली की, सोनगाव ग्रामपंचायतीतील गिट्टी खदानीची परवानगी द्यायची असेल तर प्रदूषण नियंत्रण मंडळाचा दाखला पाहिजे असतो. मग क्षारपाणी सोडण्यासाठी दाखला नको का. यावर प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस विशद केले की, ते इंडस्ट्री शेड्यूलमध्ये येते. समितीने विचारणा केली की, खाणपट्ट्यातील प्रदूषण रोखण्याकरिता कार्यक्रम राबविला पाहिजे, मात्र तो राबविला जात नाही. त्याप्रमाणे कार्यक्रम राबवित आहात का. हा कोल्हापूरचा जरी विषय असला तरी संपूर्ण महाराष्ट्रात जेथे खाणपट्टे आहेत, तेथे कार्यक्रम राबवित नाही. झाडे लावली पाहिजेत, प्रदूषण रोखण्याकरिता बाकीच्या गोष्टी रोखल्या पाहिजेत. प्रदूषण रोखण्याकरिता कार्यवाही केली पाहिजे. मात्र ते काहीही करीत नाही. विभागाचे अधिकारी प्रत्येक जिल्ह्यात आहेत. जिल्ह्यातील सर्व उद्योग पाहण्याचे त्यांचे काम आहे, मात्र ते पाहत नाहीत. फक्त भेट देऊन परत येतात. अधिकारी असताना असे का होते, ते का काम करीत नाहीत. यावर प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी यासंदर्भात लक्ष देण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

नद्यांमध्ये सांडपाणी सोडण्याची ग्रामपंचायतींना परवानगी दिली आहे का, अशी समितीने विचारणा केली असता, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी समितीस नाही असे उत्तर दिले. पुढे समितीने विचारणा केली की, परवानगी दिली नसताना ते नद्यांमध्ये सांडपाणी सोडतात. जशी कारवाई महानगरपालिकेवर करतात तशी कारवाई ग्रामपंचायतींवरही करावी. मोठ्या ग्रामपंचायतींनी गावाच्या हद्दीतच पाणी अडविले पाहिजे जेणेकरून पाणी झिरपून पाण्याची पातळीही वाढेल आणि शुद्ध झालेले पाणी झिरपून नदीत जाईल. प्रामाणिक प्रयत्न केले तर कमी खर्चात पाणी चांगल्याप्रकारे शुद्ध होऊन नदीत जाऊ शकते, पण प्रयत्न केले तरच हे होऊ शकते. मात्र विभाग प्रयत्नच करीत नाहीत.

गावात प्रदुषित झालेले पाणी आहे, संडास, बाथरुमचे पाणी आहे. नाल्याने पाणी बाहेर जाते, तेथे एखादा बंधारा घातला तर हे होऊ शकेल. मोठ्या प्रमाणात शोष खड्डे होणार नाहीत. पण एखादा बंधारा घातला आणि त्याला जाळ्या लावल्या, पाणी झिरपले आणि नंतर प्रक्रिया (ट्रीट) करून नदीत सोडले तर ते शक्य आहे. प्रत्येक बाबतीत तांत्रिक मार्गदर्शन करणारे लोक आहेत. नगरविकास विभागाने खुली सूट दिली आहे. मुंबईत असे काहीही करू शकत नाही. पण निदान पंचगंगेचे प्रकरण पहावे. माननीय आमदार, माननीय खासदार, माननीय मंत्री या सर्वांची हीच ओरड होती. पंचगंगा नदी प्रदुषित झाली आहे, तिला चांगले कसे करता येईल ते पहावे, असे ते सांगत आहेत. त्यामुळे हा मुद्दा महत्त्वाचा असून यामध्ये लक्ष घालावे. तसेच पंचगंगा नदीच्या संदर्भातील प्रकरण न्यायालयात आहे. सादरीकरण करण्यात आले होते. प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना झाली पाहिजे, महाराष्ट्रात असे कुठेही होत असेल तर यावर नियंत्रण मिळविण्याकरिता विभागाने तात्काळ कारवाई केली पाहिजे. विभागाने कुठे व कोणती ॲक्शन घेतली, या संदर्भातील अहवाल समितीला १ महिन्याच्या आत सादर करावा, असे समितीने निदेश दिले.

## अभिप्राय व शिफारशी

कोल्हापूर जिल्हा परिषद क्षेत्रामधील एकूण १७४ ग्रामपंचायतीमधून एकूण २३ एमएलडी सांडपाण्याची निर्मिती होते. सदर पाणी विनाप्रक्रिया नदीत सोडले जाते. ग्रामपंचायतीमधून निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया यंत्रणा उभारण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची आहे.

जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी पंचगंगा खो-यातील १७३ गावांपैकी पहिल्या टप्प्यातील ३९ गावांच्या सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाचा रु. १०८.९३ कोटी रकमेचा प्रस्ताव केंद्र शासनाने अमान्य केल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी पुन्हा पंचगंगा प्रदुषण निर्मूलनासाठी जिल्हा परिषदेतंर्गत पहिल्या टप्प्यातील ३१ गावांचा सांडपाणी व ३८ गावांचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प मंजूरीकरीता पर्यावरण विभागाकडे सादर केला आहे.

**पर्यावरण विभागामार्फत राज्य नदी संवर्धन योजनेंतर्गत प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या पर्यावरण विभागामार्फत केंद्र शासनाकडे रु. ३८०० कोटी निधी उपलब्ध करून देण्याबाबत प्रस्ताव पाठवण्यात आला असून त्या प्रस्तावामध्ये कोल्हापूर जिल्हा परिषदेतंर्गत पहिल्या टप्प्यातील ३१ गावांच्या सांडपाणी व ३८ गावांच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी रुपये १०८ कोटी मंजूर करणेबाबत प्रस्तावाचा समावेश आहे. पंचगंगा नदी प्रदूषणासंदर्भातील बाब राज्य शासनाच्या पर्यावरण विभाग, नगरविकास विभाग व ग्रामविकास विभागांशी निगडीत असून त्याअनुषंगाने या विभागांतर्गत आपसी समन्वय साधून राज्य नदी संवर्धन योजनेंतर्गत संपूर्ण राज्यातील विविध महानगरपालिका क्षेत्रामधील नद्यांमध्ये होत असलेल्या प्रदूषणास आळा घालण्याकरीता पाठविलेल्या प्रस्तावास केंद्र शासनाकडून त्वरित मंजूरी प्राप्त होण्याकरीता कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. त्यानुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

**राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने पंचगंगा नदी प्रदूषणाबाबत कोल्हापूर महानगरपालिकेविरुद्ध ४ फौजदारी खटले दाखल केले असून २१ लाखाची बँक हमी जप्त केली असल्याचे समितीस अवगत करण्यात आले. पर्यावरण विभागामार्फत कायदा व नियमांचा भंग करणा-यांविरुद्ध खटले दाखल केल्यानंतर त्या खटल्यांचा योग्य तो पाठपुरावा करण्यात येत नसल्याने सदर खटले तार्किक निष्कर्षाप्रत (Logical End) पोहचत नाही व त्यामुळे संबंधीत दोषी व्यक्ती व संस्थांवर कायदयाचा धाक व जरब राहात नाही. याअनुषंगाने खटल्यांचा पाठपुरावा करणे व खटले विहित कालावधीमध्ये अंतिम निष्कर्षाप्रत पोहचण्यासंदर्भात तातडीने यंत्रणा स्थापित करणेबाबत पर्यावरण विभागाने कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**कोल्हापूर शहरामधील गटारातील सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन तसेच पंचगंगा नदी प्रदूषणरहीत राहण्याकरीता कसबा बावडा येथे ७६ द.ल.लि. क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र बांधणे व इतर अनुषंगिक कामे पूर्ण करणे, जयंती नाला येथील पंपिग स्टेशनचे श्रेणीवाढ (अपग्रेडेशन) करणे, लाईन बाझार नाला व बापट कॅम्प नाला येथील पंपिग स्टेशन उभारणे, दुधाळी येथे १७ द.ल.लि. क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणे व इतर अनुषंगिक कामे पूर्ण करणे, अमृत अभियान अंतर्गत मंजूर कोल्हापूर शहर मलनि:सारण प्रकल्प पूर्ण करणे याकरीता आवश्यक निधी उपलब्ध करून कामे त्वरीत पूर्ण होणेकरीता राज्य शासन व महानगर पालिकेमार्फत त्वरित कार्यवाही करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या केंद्र पूरस्कृत योजनेतंर्गत केंद्र शासनाकडून ६० टक्के व राज्य शासनाकडून ४० टक्के हिस्सा दिला जातो. या योजनेतंर्गत सार्वजनिक घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन बाबींवर खर्च करण्यासाठी ५०० पेक्षा जास्त कुटूंब असलेल्या ग्रामपंचायतीसाठी रुपये २०.०० लाख इतकी तरतूद अनुज्ञेय आहे. प्रत्येक गावांची भौगोलिक परिस्थिती वेगवेगळी असून प्रत्येक गावांमध्ये सारखेच प्रकल्प राबविणे शक्य नसल्याने, सदरहू निधी ठराविक बाबींवरच खर्च करावा इत्यादी अटी शासनाने लादल्याने व प्रत्येक क्षेत्राकरीता २० लक्षची तरतूद अपूर्ण असल्याने सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यामध्ये अनेक अडचणी उद्‌भवत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

स्वच्छ भारत मिशन या योजनेंतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविण्याकरीता प्रकरणपरत्वे नमुद अटी शिथिल करण्यात याव्यात, तसेच रुपये २० लक्षची तरतूद अपूर्ण असल्याने खर्चाच्या मर्यादेमध्ये रुपये ४० लक्ष इतकी वाढ करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, कोल्हापूर (प्रशासन)

### कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात ग्रामसेवक, तलाठी, शिक्षक व कृषी अधिकारी मुख्यालयी राहत नसल्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत कोल्हापूर जिल्हा परिषदेस भेट दिली असता भेटीदरम्यान ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसेवक, महसुली विभागासाठी तलाठी, शिक्षण विभागातील शिक्षक, कृषी विभागातील अधिकारी यांनी शासनाच्या योजना व्यवस्थित राबविण्याकरीता प्रत्येक गावात अधिका-यांनी जाणे, लोकांशी समन्वय साधून यासाठी त्यांनी गावात राहणे अनिवार्य आहे. उक्त कर्मचारी व अधिकारी यांनी मुख्यालयी राहण्याबाबत न्यायालयाचे निर्णय असले तरीही घरभाडे पात्रतेसाठी कर्मचा-यांनी ग्रामीण भागात कामाच्या ठिकाणी वास्तव्य करणे अनिवार्य आहे. कामाच्या ठिकाणी कर्मचा-याने वास्तव्य न केल्यास राज्य शासन राबवित असलेल्या विविध योजनांवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात आधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुदयांबाबत विभागाकडून माहिती मागविली :-

ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसेवक, महसूली विभागासाठी तलाठी, शिक्षण विभागातील शिक्षक व कृषी विभागातील अधिकारी यांनी शासकीय व लोकोपयोगी योजना यशस्वीरित्या राबविण्यासाठी प्रत्येक गावामध्ये तेथील स्थानिक लोकांशी समन्वय साधला जावा याकरीता मा.न्यायालयाच्या आदेशानुसार घरभाडे पात्रतेसाठी कर्मचा-यांनी ग्रामिण भागात कामाच्या ठिकाणी वास्तव करणे अनिवार्य आहे. यासंदर्भात वित्त विभाग, महसूल विभाग व ग्रामविकास विभागाची नेमकी भूमिका काय आहे.

उपरोक्त मुदयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली:-

> ग्रामसेवक, तलाठी, शिक्षक व कृषि विभागातील कर्मचारी हे प्रामुख्याने ग्रामिण भागात काम करतात व लोकोपयोगी योजना राबविण्याच्या मोहिमेत ते थेटपणे ग्रामीण नागरिकांशी जोडलेले असतात. त्यानुसार सर्व कर्मचा-यांनी कामाचे ठिकाणी वास्तव करणे अनिवार्य आहे. त्याप्रमाणे ग्रामीण भागातील कर्मचारी मुख्यालयी राहातात. सर्व संबंधित कर्मचा-यांना याबाबत आवश्यक सूचना दिल्या आहेत.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**वित्त विभागाचे अभिप्राय - अप्राप्त**

**महसूल विभागाचे अभिप्राय-** महसूल विभागाच्या दिनांक ६ जानेवारी, २०१७ च्या शासन पत्रान्वये, सर्व जिल्हाधिकारी यांना, तलाठी कार्यालयात जनतेची गैरसोय होऊ नये म्हणून व जनतेस आवश्यक त्या सेवा वेळेत उपलब्ध होण्यासाठी तलाठी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी तसेच ज्या सज्जांच्या ठिकाणी तलाठी/मंडळ अधिकारी यांना शासनाने निवासस्थाने उपलब्ध करून दिली आहेत त्यांनी त्या निवासस्थानी राहण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय -** (आस्था-७) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुदयावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी कोल्हापूर जिल्हा परिषदेतील काही कर्मचारी तालुका किंवा शहराच्या ठिकाणी राहतात. त्यांनी मुख्यालयी राहावे हे बंधनकारक आहे किंवा कसे. गावात राहणारे तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक यांच्या माध्यमातून शासनाच्या योजना योग्य प्रकारे राबवणे आवश्यक असते. एखाद्या ग्रामसेवकाकडे ३ ते ४ ग्रामपंचायती असल्यास तो एका गावात राहतो. एका गावातील लोकांनी विचारले असता दुस-या गावात असल्याचे सांगितले जाते. असे प्रकार अनेकदा घडतात. मागील वेळी न्यायालयात निर्णय झाला होता. तो एका केस संबंधीचा विषय होता अशी समितीने विचारणा केली असता, प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी समितीस विशद केले की, सन १९८४ चा शासन निर्णय होता त्यामध्ये घरभाडे भत्ता (एचआरए) करिता राहणे (स्टे) अनिवार्य आहे. दिनांक २५ एप्रिल, १९८८ व दिनांक ५ फेब्रुवारी, १९९० मध्ये शासन निर्णय काढण्यात आला त्यात मुख्यालयी राहणे अनिवार्य नाही असे नमूद केले होते. मात्र त्यानंतर दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सन १९८४ च्या मुळ शासन निर्णयामधील मुख्यालयी राहणे अनिवार्य असल्यासंदर्भातील धारणा कायम करण्यात आली आहे.

समितीच्या मागील १५ जिल्ह्यांतील भेटी दरम्यान वारंवार हाच विषय प्रामुख्याने समितीच्या निदर्शनास आला. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी देखील जुन्या पत्रकाचा आधार देत या विषयास बगल देण्याचा प्रयत्न केला. याबाबत आपण काही तरी शासन स्तरावरुन ॲक्शन घेणे गरजेचे आहे अशी समितीने विचारणा केली असता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विशद केले की, सामान्यपणे ग्रामसेवक तेथे राहत आहेत, याकरिता सरपंचांचे प्रमाणपत्र घेतले जाते. यावर समितीने विचारणा केली की, सरपंचांचा दाखला तरी किमान जोडण्यास सुरूवात करावी. तेथे राहून त्यांनी लोकांची कामे करावी, लोकांची कामे सुरळीत व्हावी हा समितीचा उद्देश आहे. ग्रामसेवक नियमितपणे लोकांना भेटले पाहिजेत. अनेक ठिकाणी ग्रामसेवक राजकारण करतात. या संदर्भात सर्वच विभागांसाठी परिपत्रक काढले पाहिजे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीच्या अभिप्रायाबाबत अशी माहिती दिली की, साईड डिक्लरेशन किंवा सरपंचांचा दाखला या शिवाय त्यांचा पगार काढला जाणार नाही. ग्रामसेवकांबद्दल व शिक्षकांच्या संबंधी शासन परिपत्रक काढू शकते, कारण ते जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली आहेत. कृषी सहायक, तलाठींबाबत ग्रामविकास विभाग परिपत्रक काढू शकत नाही. तथापि, समितीने दिलेल्या सूचनांसंबधात विभागांना कळविण्यात येईल.

ग्रामसेवकांकरिता सरपंचाचा दाखला योग्य आहे. इतर विभागाच्या अधिका-यांकरिता कोणाचा दाखला घेणार. अनेक ठिकाणी असे दिसून येते की, तलाठी अनेकदा गावात येतच नाहीत. सचिव फोन उचलतात मात्र तलाठी फोन उचलत नाहीत असे समितीने मत व्यक्त केले असता, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग यांनी समितीस विशद केले की, वास्तव्याचा पुरावा म्हणून ग्राहय धरण्यात येणार नाही. त्यांना सूचना दिली आहे की, त्यांनी मुख्यालयी थांबले पाहिजे. तरी देखील अनेक तलाठी मुख्यालयी थांबत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. घरभाडे भत्ता (एचआरए) बाबत वित्त विभागाच्या शासन निर्णयाची (जीआरची) अंमलबजावणी करण्याबाबत जिल्हाधिका-यांना सूचना दिली जाईल.

समितीने विचारणा केली की, आपल्याकडे जिल्हाधिका-यांची बैठक होते. हा निर्णय खालपर्यंत पोहचला पाहिजे. त्याबाबत अंमलबजावणी झाली पाहिजे. याबाबत आपल्यालाच ठरवावे लागेल. यावर अपर मुख्य सचिव, महसूल विभाग यांनी समितीस विशद केले की, कोणाचा दाखला घेता येऊ शकतो याबाबत मी जिल्हाधिका-यांशी चर्चा करतो.

समितीने यासंबंधात पुढे अशी विचारणा केली की, ड्युटी चार्ट तपासल्याशिवाय त्या कर्मचा-यांचा पगार कसा होतो. गावात ते येतच नाही तर डयुटी कशी करतात. यावर अपर मुख्य सचिव, महसूल विभाग यांनी समितीस विशद केले की, तलाठींकरिता डयुटी चार्ट आहे, त्यांची कर्तव्ये विहित करण्यात आली आहेत. त्या अनुषंगाने ते कामे करतात. ते आपली उपस्थिती नोंदवतात. त्यांचे मंडल अधिका-यांकडून पर्यवेक्षण केले जाते.

समितीने याबाबत आणखी अशी विचारणा केली की, तलाठी, मंडल अधिकारी या सर्वांना निवासस्थाने बांधून दिलेले आहेत, यामुळे घरभाडे भत्ता दिला जात नाही. मात्र तरी देखील ते मुख्यालयी राहत नाहीत. अनेक तलाठी गावातील लोकांना कामाकरिता तहसील कार्यालयात बोलावतात. यावर अपर मुख्य सचिव, महसूल विभाग यांनी समितीस विशद केले की, डिजीटल इंडिया लँड रेकॉर्डींग प्रोग्राम अंतर्गत तलाठी तालुका मुख्यालयी जाऊन संगणकीकरणाचे काम करीत होते. काही प्रकरणी असे झाले असेल की, त्या तलाठ्यांनी लोकांना भेटण्याकरिता मुख्यालयी बोलावले असेल. मात्र आता ते काम पूर्ण होत आलेले आहे. त्यामुळे तशी परिस्थिती नाही. आता पूर्वीपेक्षा तलाठी मुख्यालयी कमी येतात. सभा असल्यास त्याकरिता ते येतात. यावर समितीने निदेश दिले की, आपण या संबंधी मार्ग काढावा. धोरण निश्चित करावे. यावर अपर मुख्य सचिव, महसूल विभाग यांनी समितीस विशद केले की, जिल्हाधिकारी व क्षेत्रीय अधिका-यांशी चर्चा करतो. त्यानंतर या संबंधीची कार्यपद्धती आपण विहित करू. यास शासन मान्यता घ्यावी लागेल. सदर कर्मचा-यांची संघटना आहे. कोणाचे प्रमाणपत्र लागणार आहे या बाबतची सर्व कार्यपद्धती विहित करू. तदनंतर समितीने विचारणा केली की, आपण पटवा-यांची बाजू घेत असून त्यांना संरक्षण देत आहात. आयुक्त व जिल्हाधिकारी पटवा-यांच्या संघटनेला घाबरतात. त्यांनी तेथे राहिले पाहिजे याकरिता तत्कालिन महसूल मंत्री यांनी सदनिका (क्वार्टर्स) बांधून दिल्या. त्यांनी त्यांचे कर्तव्य केले की नाही हे अधिकारी कधी तपासतात काय, अशी नाराजी व्यक्त करून समितीने निदेश दिले की, हे रेकॉर्डवर येण्याकरिता आपण चर्चा करावी व एक महिन्याच्या आत सर्व प्रक्रिया पूर्ण करून समितीला माहिती सादर करावी. यावर अपर मुख्य सचिव, महसूल विभाग यांनी समितीस निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत समितीला आश्वासीत केले.

**अभिप्राय व शिफारशी**

सन १९८४ च्या शासन निर्णयात घरभाडे भत्ता (एचआरए) मिळण्याकरिता मुख्यालयी राहणे (स्टे) अनिवार्य असल्यामुळे दिनांक २५ एप्रिल, १९८८ व दिनांक ५ फेब्रुवारी १९९० मध्ये यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आले असून ग्रामसेवक, तलाठी, शिक्षक इत्यादींनी मुख्यालयी राहणे अनिवार्य नसल्याचे नमूद केले होते. पंचायती राज समितीने सन २००८ मध्ये दिलेल्या निर्देशास अनुसरुन ग्रामविकास व जलसंधारण विभागाने त्यांच्या अधिनस्त जिल्हा परिषदेंतर्गत गट - क व गट- ड मधील कर्मचारी त्यांच्या मुख्यालयी राहत नसतील तर त्यांचा घरभाडे भत्ता व वेतन वाढ रोखण्यात यावी व त्यांच्याविरुद्ध शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात यावी अशा आशयाची परिपत्रके

दिनांक ५ जुलै २००८ व दिनांक ३ नोव्हेंबर, २००८ रोजी निर्गमित केली. शासनाच्या सदर निर्णयाविरुद्ध शिक्षक संघटनांनी मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या याचिकेमध्ये ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ५ जुलै, २००८ व दिनांक ३ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या परिपत्रकामध्ये व वित्त विभागाच्या दिनांक ५ फेब्रुवारी, १९९० च्या शासन निर्णयामधील तरतूद अधिक्रमित होत नसल्याचा निष्कर्ष काढून घरभाडे भत्ता रोखून ठेवला असल्यास तो तात्काळ अदा करावा असे आदेशित केले व शासन निर्णय दिनांक २५ एप्रिल, १९८८ व दिनांक ५ फेब्रुवारी, १९९० मधील 'ग्रामीण भागातील कर्मचा-यांच्या बाबतीत, कामाच्या ठिकाणी राहण्याच्या संबंधात घरभाडे भत्त्याच्या पात्रतेसाठी विहीत केलेली शर्त मात्र काढून टाकण्यात येत आहे' असे नमूद करून ही तरतूद वगळण्यात आली.

राज्य शासनामार्फत राबविण्यात येणा-या विविध लोकोपयोगी व विकासकामाशी निगडीत योजना अयशस्वी होण्यामागे इतर कारणांसह संबंधित अधिकारी / कर्मचारी मुख्यालयी तसेच कामाच्या ठिकाणी राहत नसणे हेही एक महत्वाचे कारण असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना तसेच गोरगरीब शेतक-यांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत असून आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो.

राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामसेवक, शिक्षक, तलाठी, कृषी सहाय्यक, आरोग्य सेविका, वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी, पशुवैद्यकीय दवाखान्यातील अधिकारी / कर्मचारी इत्यादी अधिकारी/कर्मचारी बहुतांश करून ग्रामीण भागात राहात नाहीत. शहरातून दररोज संबंधित गावात जाणे येणे केल्यामुळे त्या गावातील विकासाच्या योजना, पाणी पुरवठयाच्या योजना, शेतीच्या संदर्भातील तज्ञांच्या शिफारशी व मार्गदर्शन, दुधाळ जनावरे व शेती उपयोगी पशुंचा वेळेवर औषधोपचार तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आपत्कालिन रुग्णांना प्रथमोपचार इत्यादी अनेक सोयी-सुविधांपासून वंचित राहवे लागते.

कोल्हापूर जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात सदरहू शासन निर्णयाचे तंतोतंत पालन होत नसल्याचेही समितीच्या लक्षात आले असून राज्य शासनाच्या विविध कामांसंदर्भात तसेच व्यक्तीगत कामांसंदर्भात सर्वसामान्य नागरिकांशी अत्यंत निगडीत व गरजेचे असणारे जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावरील अधिकारी / कर्मचारी, तलाठी, ग्रामसेवक इत्यादी मुख्यालयी / कामाच्या ठिकाणी राहत नाहीत ही वस्तुस्थिती असून सद्य:स्थितीतील शासन निर्णयाची कठोरपणे अंमलबजावणी करण्यामध्ये शासन पूर्णपणे अपयशी ठरले आहे. यामुळे राज्य शासनाची विकासकामे यशस्वीपणे राबविण्याकरिता संबंधित अधिकारी / कर्मचारी व सर्वसामान्य नागरिक यांच्यामधील समन्वय साधण्यासाठी शासकीय यंत्रणा कमी पडत असल्याचे समितीचे मत आहे.

**अधिकारी व कर्मचा-यांनी मुख्यालयी राहण्याच्यासंदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन नव्याने शासन निर्णय निर्गमित करून ग्रामीण भागातील कर्मचा-यांनी प्रामुख्याने राज्य शासनाच्या विविध कामांसंदर्भात तसेच व्यक्तीगत कामांसंदर्भात सर्वसामान्य नागरिकांशी अत्यंत निगडीत व गरजेचे असणारे ग्रामसेवक व तलाठी यांनी मुख्यालयी तसेच कामाच्या ठिकाणी वास्तव्य करणे अनिवार्य करण्यात यावे तसेच नियमांचे उल्लंघन करणा-यांविरुद्ध दंडात्मक तरतूदी सदर शासन निर्णयात अंतर्भूत करण्यात याव्यात व सदर तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याकरिता सर्वंकष यंत्रणा प्रस्थापित करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**ग्रामसेवक मुख्यालयी राहत असल्यासंदर्भात ग्रामपंचायतींच्या सरपंचांचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येत असल्याचे तसेच तलाठी मुख्यालयी राहत असल्यासंदर्भात पुरावा म्हणून कोणाचा दाखला घेता येऊ शकेल याची शहानिशा करण्यात येईल, तसेच सदरहू शासन निर्णयाचे कृषी सहायक व तलाठी यांनी तंतोतंत पालन करावे याकरिता जिल्हाधिका-यांना सूचना देण्यात येतील व यासंदर्भात नव्याने परिपत्रक काढण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस साक्षीदम्यान आश्वासीत केल्याप्रमाणे त्याबाबत त्वरित कार्यवाही व्हावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारास आहे.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, कोल्हापूर (प्रशासन)

### गडहिंग्लज पंचायत समिती अंतर्गत १६ पशुवैद्यकिय दवाखान्यामधील रिक्त पदे भरण्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत कोल्हापूर जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे चर्चेदरम्यान समितीने अशी विचारणा केली की, आपल्याकडे किती पशुवैद्यकिय दवाखाने व पशुधन विकास अधिकारी कार्यरत आहेत. यावर पशुधन विकास अधिकारी यांनी समितीस विशद केले की, १६ दवाखाने आहेत. पशुधन अधिकारी श्रेणी-१ ची एकूण १२ पदे मंजूर असून त्यापैकी फक्त ४ पदे भरलेली आहेत व ८ पदे रिक्त आहेत. त्याशिवाय शिपाई संवर्गातील ७ पदे रिक्त असल्याने काम करताना खूप अडचणी येतात.

यानुषंगाने समितीने रिक्त पदे भरण्यासंदर्भात कार्यवाही होणे करीता विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल असे स्पष्ट केले.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात आधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.

गडहिंग्लज पंचायत समिती अंतर्गत १६ पशुवैद्यकिय दवाखान्यामधील पशुधन विकास अधिकारी श्रेणी-१ ची एकूण १२ पदे मंजूर असून त्यापैकी ४ पदे भरलेली आहेत व ८ पदे रिक्त आहेत त्याशिवाय शिपाई संवर्गातील ७ पदे रिक्त आहेत. सदरहू रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

उपरोक्त मुदयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—

(१) गडहिंग्लज पंचायत समिती अंतर्गत श्रेणी १ चे १२ व २ चे ४ असे एकूण १६ पशुवैद्यकिय दवाखाने असून पशुधन विकास अधिकारी श्रेणी-१ ची एकूण १२ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ४ पदे भरलेली आहेत व ८ पदे रिक्त आहेत. सदरहू पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जातात. सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत या कार्यालयाकडील पत्र क्र. अ.शा.केजिप/पशुसं/आस्था-३/४१७७/२०१६, दिनांक ६ सप्टेंबर, २०१६, क्र. अ.शा.केजिप/पशुसं/आस्था/३४०/२०१७, दिनांक १७ मे २०१७ व क्र. केजिप/पशुसं/आस्था/वशि-३/१३८०/२०१८, दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ नुसार शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे. श्रेणी २ च्या ४ मंजूर पदापैकी ४ ही पदे भरलेली आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यात श्रेणी १ चे ८२ व श्रेणी २ चे ५७ असे एकूण १३९ पशुवैद्यकिय दवाखाने असून पशुधन विकास अधिकारी श्रेणी १ ची एकूण ९५ एवढी पदे मंजूर आहेत. त्यापैकी ३३ पदे भरलेली आहेत व ६२ पदे रिक्त आहेत. तथापि, नियतकालिक बदल्या सन २०१९ शासन आदेश क्र.पसंप्र-२०१९ प्र.क्र. ०७/पदुम-१/(आदेश क्र. १ ते ६) दिनांक ४ जुलै, २०१९ अन्वये कोल्हापूर जिल्हयात एकूण १४ पशुधन विकास अधिकारी यांना नियुक्ती देणेत आलेली आहे. तसेच श्रेणी २ चे एकूण १०१ मंजूर पदांपैकी ८८ एवढी पदे भरलेली आहेत, व सरळसेवेने सन २०१९ मध्ये ४ पदे भरणेबाबतची जाहीरात देण्यात आलेली आहे.

(२) १. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र. ५७/२०१५/विसु-१, दिनांक १४ जानेवारी, २०१६ व महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण ५०१६/प्र.क्र. ८७/आस्था-८, दिनांक ५ मे, २०१६ अन्वये गट ड संवर्गाची २५ टक्के परिचर पदे निरसीत केली आहेत.

२. त्यास अनुसरुन इकडील जा.नं/कोजिप/साप्रवि/कावि/१/२५७-४२१/२०१९, दिनांक १ फेब्रुवारी, २०१९ अनव्ये जिल्हा परिषदेकडील सर्व विभागनिहाय परिचर संवर्गाची २५ टक्के पदे निरसीत केली आहेत. म्हणजेच एकूण या जिल्हा परिषदेसाठी मंजूर असलेल्या ८४४ पदापैकी २११ पदे निरसीत केली आहेत.

३. जो पर्यंत निरसीत पदे सेवा निवृत्तीने कमी होत नाहीत, तो पर्यंत परिचर संवर्गाची नव्याने पदभरती करता येत नाही.

४. गडहिंग्लज तालुक्यात १६ पशुवैद्यकिय दवाखान्यासाठी १७ परिचर पदे मंजूर असून त्यापैकी २५ टक्के पदे निरसीत वगळता उर्वरित ७५ टक्के पदे म्हणजेच १३ पदांपैकी ९ पदे भरलेली आहेत, व ४ पदे अद्याप रिक्त असून नव्याने भरती होईपर्यंत पंचायत समिती स्तरावरुन सदर पदे अंतर्गतरित्या तात्पुरत्या स्वरुपात भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

प्रस्तुत कामी शासन धोरण प्रमाणे कार्यवाही करण्यात येत असल्याने या कामी जिल्हा परिषद स्तरावर विलंब झालेला नाही.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**पशुसंवर्धन विभागाचे अभिप्राय-** गडहिंग्लज पंचायत समिती अंतर्गत श्रेणी १ चे १२ व २ चे ४ असे एकूण १६ पशुवैद्यकीय दवाखाने असून पशुधन विकास अधिकारी श्रेणी-१ ची एकूण १२ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ४ पदे भरलेली आहेत व ८ पदे रिक्त आहेत. पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी २ चे ४ मंजूर पदापैकी ४ ही पदे भरलेली आहेत.

**पशुधन विकास अधिकारी गट -**अ ही पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जातात. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून २५ उमेदवारांची शिफारस करण्यात आलेली असून त्याना पदस्थापना देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. तसेच उर्वरित पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पशुधन विकास अधिकारी (गट-अ) या संवर्गातील ४३५ पदाचे मागणी पत्र सादर करण्यात आले असून त्यानुसार शासन स्तरावरून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुदयावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १३ ऑगस्ट २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान समितीने गडहिंग्लज पंचायत समिती अंतर्गत पशु वैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदे भरण्यात आली आहेत काय अशी विचारणा केली. यावर उप सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी समितीस विशद केले की, गडहिंग्लज तालुक्यातील रिक्त पदांबाबतचा विषय होता. एमपीएससीकडून २५ उमेदवार आले आहेत. त्यातील एका उमेदवाराला पुणे विभागाचे वाटप झाले असून त्याचे पदस्थापना (पोस्टींग) गडहिंग्लजमध्ये करीत आहोत. इतर ४३५ पदांचे मागणीपत्र दिनांक २७ डिसेंबर, २०१८ रोजी दिलेले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, गडहिंग्लज तालुक्यात ८ पदे रिक्त असून एक पद भरले जात आहे. एकच उमेदवाराला पुणे विभाग मिळाला व इतर सर्व जणांना नागपूर विभाग मिळालेला आहे. आता विभाग वाटपाचा नियम आलेला आहे. तेथील पदे भरल्याशिवाय इतर ठिकाणी पदे भरता येत नाही. गडचिरोली, गोंदिया व नागपूर या ३ जिल्ह्यातील पदे भरायची आहेत, व आपली प्रक्रिया सुरू आहे काय. यावर उप सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी समितीस विशद केले की, अटेंडंट व पशुधन पर्यवेक्षक या पदाची प्रक्रिया सुरू आहे. ती परीक्षा आता पुढे ढकलण्यात आलेली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

समितीस साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी अवगत केले की, पशुधन विकास अधिकारी गट-अ बाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून २५ उमेदवारांची शिफारस करण्यात आली असून त्यातील एका उमेदवाराची पदस्थापना (पोस्टींग) गडहिंग्लज मध्ये करण्यात येणार असून इतर ४३५ पदांची मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सुपूर्त करण्यात आले आहे. तसेच अटेंडंट व पशुधन पर्यवेक्षक या पदाची पद भरती प्रक्रिया सुरू असून त्या संदर्भातील परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आणले.

कोल्हापूर जिल्ह्यात श्रेणी-१ चे एकूण १४ पशुधन अधिकारी यांना नियुक्ती देण्यात आली आहे. श्रेणी-२ च्या एकूण १०१ मंजूर पदांपैकी ८८ पदे भरण्यात आली आहे व ४ पदे भरण्याबाबत जाहीरात देण्यात आली आहे. गडहिंग्लज तालुक्यात १६ पशुवैद्यकिय दवाखान्यासाठी १७ परिचर पदे मंजूर असून त्यापैकी २५ टक्के पदे निरसित वगळता उर्वरित ७५ टक्के पदे म्हणजेच १३ पदांपैकी ९ पदे भरलेली आहेत, व ४ पदे अद्याप रिक्त असून नव्याने भरती होईपर्यंत पंचायत समिती स्तरावरून सदर पदे अंतर्गतरित्या तात्पुरत्या स्वरूपात भरण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

राज्यातील मौल्यवान पशुधनाचे आरोग्य सुदृढ/अबाधित राहिल्यास त्यापासून दूध, शेणखत, मांस या तीन बाबींचे जास्तीत जास्त उत्पादन होवून पशुपालकांना त्याचा आर्थिक फायदा होवून कृषि विकासाचा दर वाढेल यासाठी पशुधनास पशु उपचाराच्या सुविधा देणेसाठी विविध स्तरावर पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत आहेत. या दवाखान्यांमार्फत आजारी जनावरांची तपासणी करून त्यांचे अचूक रोगनिदान व अनुषंगिक उपचार करणे तसेच सांसर्गिक रोग प्रादुर्भाव होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेची महत्त्वाची जबाबदारी आहे. सांसर्गिक रोगाचा प्रादुर्भाव उद्‌भवल्यास त्याचे निदान, उपचार व त्यावर नियंत्रण ठेवणेसाठी या पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत कार्यवाही केली जाते.

राज्यातील तालुक्यांचे ठिकाणी व तालुक्यातील काही मोठ्या गावांमध्ये ज्या ठिकाणी पशुधन घटक जास्त आहेत अशा ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ कार्यरत आहे. या दवाखान्यांमध्ये पदवीधर पशुवैद्यकामार्फत पशुवैद्यकीय सेवा पुरविल्या जातात ज्यामध्ये पशु रुग्णांवर उपचार, रोग नियंत्रणासाठी प्रतिबंधक उपाययोजना, कृत्रिम रेतन सुविधा तसेच शल्यचिकित्सा या सुविधा पुरविल्या जातात. राज्यात स्थानिकस्तरीय व राज्यक्षेत्रिय असे एकूण १७४० पशुवैद्यकीय दवाखाने (श्रेणी-१) कार्यरत आहेत.

राष्ट्रीय कृषि आयोगाच्या शिफारशीप्रमाणे राज्यात दर ५००० पशुधन घटकामागे १ पशुवैद्यकीय दवाखाना असणे आवश्यक आहे. त्यामुळे ग्रामपातळीवरील पशुधनास किरकोळ पशुवैद्यकीय सेवा पुरविणेसाठी बिगर पदवीधर पशुवैद्यकामार्फत पशुवैद्यकीय सेवा पुरविल्या जात असलेले २८४१ (राज्यक्षेत्रिय व स्थानिकस्तरीय) पशुवैद्यकीय दवाखाने (श्रेणी-२) कार्यरत आहेत.

संपूर्ण राज्यामध्ये पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी-१ व श्रेणी-२ यामध्ये फार मोठया प्रमाणात रिक्त पदे असून त्याचा परिणाम राज्यातील मौल्यवान पशुधनाची आरोग्य अबधित राहण्यात बाधक ठरत आहे. पशुधन उपचाराच्या योग्य सुविधा न मिळाल्याने पशुपालकांना आर्थिक तोटा सहन करावा लागत असून कृषि विकासाचा दर वृद्धींगत होण्यामध्ये अडसर निर्माण होत असल्याचे समितीचा अभिप्राय आहे.

**कोल्हापूर जिल्हयामध्ये श्रेणी-२ ची ४ पदे भरण्यासंदर्भात जाहिरात देण्यात आल्याचे तसेच गडहिंग्लज तालुक्यात पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी ४ परिचरांची पदे नव्याने भरती होईपर्यंत पंचायत समिती स्तरावरून अंतर्गतरित्या तात्पुरत्या स्वरुपात ही पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे समितीस जिल्हा परिषदेद्वारे आश्वासित करण्यात आले असून संपूर्ण पद भरती प्रक्रिया विहित कालावधीत पूर्ण करण्यात येवून तात्काळ पद भरती करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**गडहिंग्लज तालुक्यामध्ये मंजूर १९ पदांपैकी पशुधन अधिकारी श्रेणी-१ ची एकूण ७ पदे अद्यापही रिक्त असून सदरहू रिक्त पदे भरण्यासंदर्भात त्वरित कार्यवाही करण्यात यावी तसेच अटेंडंट व पर्यवेक्षक पदाची पद भरती प्रक्रिया तात्काळ पूर्ण करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**जिल्हा परिषदेतील पशुधन विकास अधिकारी गट-अ ची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येतात. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून एकूण २५ उमेदवारांच्या नियुक्तीबाबत शिफारस करण्यात आली असून पुणे विभागाकरिता केवळ एका उमेदवाराची नियुक्ती करण्यात येणे हे समन्यायी तत्वानुसार अयोग्य असल्याचे व संबंधित विभागावर अन्यायकारक आहे. समन्यायी तत्वानुसार राज्यातील सर्व विभागांमध्ये तेथील रिक्त पदांची संख्या विचारात घेवून पद भरती प्रक्रिया राबविण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, कोल्हापूर (प्रशासन)

### आजरा पंचायत समिती अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिका-यांची पदे भरण्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत कोल्हापूर जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने विचारणा केली की, आजरा पंचायत समिती अंतर्गत किती प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत आणि किती उपकेंद्रे आहेत तसेच त्यामध्ये मंजूर पदे किती आहेत व त्यापैकी भरलेली व रिक्त पदे किती आहेत. यावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी समितीस विशद केले की, आजरा पंचायत समिती अंतर्गत एकूण ४ प्राथमिक आरोग्य केंद्रे असून तिथे प्रत्येक केंद्रासाठी २ याप्रमाणे एकूण ८ वैद्यकीय अधिका-यांची पदे मंजूर आहेत. यापैकी ५ पदे भरली असून ३ पदे रिक्त आहेत. त्यापैकी १ वैद्यकीय अधिकारी कागल येथे प्रतिनियुक्तीवर आहेत. यावर समितीने निदेश दिले की, मुळात डॉक्टरांची इतकी पदे रिक्त असताना येथील डॉक्टर दुसरीकडे प्रतिनियुक्तीवर कसे पाठविले जातात. तसेच तालुका आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रांना भेटी देता काय, ४ प्राथमिक आरोग्य केंद्रे व २७ उपकेंद्रांना भेटी देण्यासाठी त्यांना किती दिवस लागतील. यावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी समितीस विशद केले की, हा तालुका ५० कि.मी. लांब असल्यामुळे साधारणपणे ३ महिने लागतील. यावर समितीने तालुका आरोग्य अधिका-यांनी ४ दिवसात भेटी द्याव्यात असे निर्देश दिले.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.

आजरा पंचायत समिती अंतर्गत एकूण ४ प्राथमिक केंद्रे असून त्याठिकाणी प्रत्येक केंद्रासाठी २ याप्रमाणे ८ वैद्यकीय अधिका-यांची पदे मंजूर असताना ५ पदे भरली आहेत, व ३ पदे रिक्त आहेत. त्यापैकी १ वैद्यकीय अधिकारी कागल येथे प्रतिनियुक्तीवर असल्यामुळे ४ वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत आरोग्य विभागाने कोणती कार्यवाही केली आहे. अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

उपरोक्त मुदयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

आजरा तालुक्यात ४ प्राथमिक आरोग्य केंद्रे असून ८ वैद्यकीय अधिका-यापैकी ४ पदे रिक्त आहेत. कागल येथील तालुका आरोग्य अधिकारी यांना आजरा पंचायत समितीकडील कार्यभार देणेत आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एकूण ७४ प्राथमिक आरोग्य केंद्रे व इतर आरोग्य संस्थामधून मिळून एकूण १६९ पदे मंजूर असून ११३ पदे कार्यरत आहेत व ५६ पदे रिक्त आहेत. सदर कार्यरत पदांपैकी ७ वैद्यकीय अधिकारी गैरहजर आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष १०६ पदे कार्यरत आहेत. सदर रिक्त पदे भरण्यासाठी या कार्यालयाकडील दिनांक १७ जुलै, २०१८, १६ नोव्हेंबर, २०१८ व दिनांक १२ जुलै, २०१९ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांना कळविले आहे. सन २०१८-१९ मध्ये ३० बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी यांना उप संचालक स्तरावरून ११ महिन्याची नियुक्ती दिली असून त्यापैकी ११ वैद्यकीय अधिकारी यांचा कालावधी समाप्त झाला व १० वैद्यकीय अधिकारी सोडून गेले असून ९ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. वैद्यकीय अधिकारी यांची गरज लक्षात घेता जिल्हा परिषद सेसमधून १५ बीएएमएस वैद्यकीय अधिका-यांची पदे सन २०१६ मध्ये भरणेत आली आहेत. त्यापैकी सध्या ११ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. रिक्त पदांची संख्या जास्त असल्यामुळे रुग्ण सेवेकरिता अडचणी निर्माण होवू नये म्हणून दिनांक ४ जून, २०१९ रोजीच्या सर्व साधारण सभेमध्ये २० बीएएमएस वैद्यकीय अधिकारी भरण्याकरिता मान्यता घेण्यात आली असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाकडील दिनांक ४ जुलै, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये बीएएमएस किंवा एमबीबीएस वैद्यकीय अधिकारी कंत्राटी पद्धतीने जिल्हाधिकारी यांच्या अधिकारात भरण्याबाबत निर्णय झाला आहे. त्यानुसार रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय -** शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ०२ मार्च, २०१५ अन्वये गट-अ वैद्यकीय अधिकारी नियमितपणे उपलब्ध होईपर्यंत एम.बी.बी.एस. तसेच पदव्युत्तर अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी कंत्राटी पद्धतीने ११ महिन्यासाठी नेमणूक करण्यासाठी मान्यता घेण्यात आली. तसेच शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक ०३ डिसेंबर, २०१८ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. तथापि, आरक्षणाबाबत उच्च न्यायालयात याचिकामुळे तसेच निवडणूक आचारसंहितेमुळे जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्या मान्यतेने करावयाची कंत्राटी पद भरती पुढे ढकलण्यात आली होती. सद्य:स्थितीत दिनांक २६ जुलै,

२०१९ रोजी उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार असून त्यामधून आजरा तालुक्यातील वैद्यकीय अधिका-यांची पदे कंत्राटी स्वरुपात भरण्यात येणार आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ ही पदे कायम स्वरुपी भरण्याची कार्यवाही राज्य स्तरावरुन करण्यात येते त्यासाठी ८७७ पदांची जाहिरात दिनांक २७ डिसेंबर, २०१८ रोजी वर्तमान पत्रात देण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त अर्जाची छाननी करून प्राप्त उमेदवारांची गुणवत्ता यादी दिनांक १९ जुलै, २०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. पात्र २९९१ उमेदवारांमधून समुदेशाने नियुक्ती देण्याची प्रक्रिया मुंबई येथे दिनांक २३ जुलै, २०१९ ते २५ जुलै, २०१९ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. यामधून ही रिक्त पदे नियमीतरित्या भरण्यात येणार आहेत.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय-** जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीदरम्यान प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्द्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली होती. सदर साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सदर प्रश्न वैद्यकीय अधिका-यांच्या रिक्त पदांच्या संदर्भातील आहे. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विशद केले की, आजरा पंचायत समितींअंतर्गत ४ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. तेथे ८ पैकी ३ पदे रिक्त होती. मधील काळात न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्यामुळे भरती करू शकलो नाही. जिल्हा स्तरावर सेस फंडातून काही पदे भरली आहेत. २७ तारखेला जिल्हाधिका-यांनी वॉक इन इंटरव्यू ठेवला आहे. ती पदे भरली जातील. प्रत्येक जिल्ह्यात वेगवेगळ्या तारखा आहेत. पद भरतीची प्रक्रिया सुरू झाली आहे. काऊन्सिलिंग प्रक्रिया ४-५ दिवस सुरू राहील. पदे भरली जातील असे प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस आश्वासीत केले.

## अभिप्राय व शिफारशी

कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा पंचायत समिती अंतर्गत एकूण ४ प्राथमिक आरोग्य केंद्र असून त्याठिकाणी प्रत्येक केंद्रासाठी २ याप्रमाणे एकूण ८ वैद्यकीय अधिका-यांची पदे मंजूर असताना ५ पदे भरली आहेत व ३ पदे रिक्त आहेत. त्यापैकी कागल येथील तालुका आरोग्य अधिकारी यांना आजरा पंचायत समितीकडील कार्यभार प्रतिनियुक्तीने देण्यात आला आहे. अशाप्रकारे वैद्यकीय अधिका-यांची एकूण ४ पदे रिक्त असल्याची समितीच्या निदर्शनास आले.

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१५ अन्वये गट-अ वैद्यकिय अधिकारी नियमितपणे उपलब्ध होईपर्यंत एम.बी.बी.एस. तसेच पदव्युत्तर अर्हताधारक वैद्यकीय अधिका-यांची कंत्राटी पद्धतीने ११ महिन्यासाठी नेमणूक करणेसाठी मान्यता घेण्यात आली असल्याचे तसेच दिनांक २६ जुलै, २०१९ रोजी उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार असून त्यामधून आजरा तालुक्यातील वैद्यकीय अधिका-यांची पदे कंत्राटी स्वरूपात भरण्यात येणार असल्याचे समितीस आश्वासीत करण्यात आले होते.

केंद्र शासनाने ग्रामीण जनतेस आरोग्य सेवा पुरविण्याकरीता उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालय अशी त्रिस्तरीय संरचना मंजूर केली आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत प्रथमोपचार, प्रसुतीपूर्व मातांची तपासणी व किरकोळ आजारांवर औषधोपचार , कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन विषयक सल्ला व सेवा याबरोबरच क्षयरोग, कुष्ठरोग व हिवतापाच्या रुग्णांचा शोध व पाठपुरावा इत्यादी उपचार केला जातो. तसेच तातडीच्या वैद्यकीय सेवांची उपलब्धता, बाह्यरुग्ण कक्ष, ६ खांटाचे आंतररुग्ण कक्ष, शस्त्रक्रिया सेवा, प्रयोगशाळा सेवा, उपकेंद्राकडून संदर्भित केलेल्या रुग्णावर उपचार व आरोग्य सेवादेखील दिल्या जातात.

**राज्यातील ग्रामीण भागात स्वस्त व दर्जेदार आरोग्य सेवा व सुविधा प्रदान करण्यासाठी तसेच गरीब, दुर्लक्षित, गरजू ग्रामीण जनतेला सहजसाध्य, परवडण्याजोगी, कार्यक्षम, विश्वासार्ह व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सार्वजनिक आरोग्य विषयक विविध योजना केंद्रशासन तसेच राज्य शासन स्तरावरुन राबविण्यात येत असतांना आरोग्य विभागांतर्गत अ,ब,क,ड या श्रेणीच्या एकूण मंजूर ५४,११८ पदांपैकी ३९,५६५ पदे भरलेली असून १४,५५३ इतक्या मोठया प्रमाणात रिक्त पदे आहेत. यामुळे राज्यात दर्जेदार व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा सर्वसामान्य जनतेला मिळणे आवश्यक आहे. यानुषंगाने सदरहू रिक्त पदे भरण्याची तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.**

**तसेच, आजरा पंचायत समिती अंतर्गत एकूण ४ प्राथमिक आरोग्य केंद्रे असून त्याठिकाणी प्रत्येक केंद्रासाठी २ या प्रमाणे एकूण ८ वैद्यकीय अधिका-यांची पदे मंजूर असताना ५ पदे भरली आहेत व ३ पदे रिक्त आहेत. त्यापैकी कागल येथील तालुका आरोग्य अधिकारी यांना आजरा पंचायत समितीकडील कार्यभार प्रतिनियुक्तीने देण्यात आला असल्याने एकूण वैद्यकीय अधिका-यांची ४ पदे रिक्त आहेत. समितीने निर्देशित केलेल्या रिक्त पदांवर तातडीने भरती प्रक्रीया राबवावी. सदरहू रिक्त पदे भरण्यासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने तातडीने कार्यवाही करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, कोल्हापूर (प्रशासन)

### कोल्हापूर जिल्हा परिषद, गैरव्यवहार व अफरातफरीच्या प्रकरणांबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ सप्टेंबर, २०१८ या कालावधीत कोल्हापूर जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१४-१५ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने विचारणा केली की, सन २००८-०९ ते २०१४-१५ या कालावधीमध्ये जिल्हा परिषदेमध्ये गैरव्यवहार तसेच अफरातफरीच्या प्रकरणांमध्ये अद्याप वसूल न झालेली एकूण रक्कम किती आहे, सदर रक्कम वसूल करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, कोल्हापूर जिल्हा परिषदेंतर्गत सन १९९६ ते सन २०१४-१५ पर्यंत अफरातफरीची एकूण ७ प्रकरणे घडली आहेत. त्यातील ३ व्यक्तींकडून जिल्हा परिषदेने अफरातफरीची काही रक्कम वसूल केली आहे.

तद्नंतर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विशद केले की, प्रकरण क्रमांक १ व २ हे सन १९९६ मध्ये घडले असून ते आनंदा सहकारी संस्था, कोल्हापूर या संस्थेशी निगडीत आहे. पहिल्या प्रकरणात जिल्हा परिषदेची रुपये २,६१,८८१/- इतकी तर दुस-या प्रकरणात रुपये ५२,६७,६१२/- इतकी रक्कम गुंतलेली आहे. त्याचे प्रकरण न्यायालयात होते व त्याचा निकाल आता लागला आहे.

समितीने निदेश दिले की, ज्या प्रकरणी वसुलीची कार्यवाही सुरू असेल त्या प्रकरणांची माहिती समितीला द्यावी. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विशद केले की, आधी सांगितल्याप्रमाणे टिप्पणीतील अनुक्रमांक ३ येथील वरिष्ठ सहा. लेखा श्री. अरुण मारुती काटकर यांनी सन २००७-०८ या वर्षात रुपये १२,४५,३५९/- इतक्या रकमेची अफरातफर केल्याचे सिद्ध झाले होते व त्यांच्यावर न्यायालयीन खटला सुरू होता. त्यांच्याकडून रुपये ३,६२,३४८/- इतकी रक्कम वसूल करण्यात येऊन रुपये ५,२२,६९९/- इतकी रक्कम वसूल करणे शिल्लक होते. दरम्यान ते माहे जानेवारी, २०१६ मध्ये मयत झाले असल्यामुळे त्यांच्याकडील वसुली थांबली आहे.

समितीने विचारणा केली की, इतर जे ३ जण आहेत त्यांची वसुली सुरू आहे काय? यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विशद केले की, त्यावेळी दोन अधिका-यांकडून रुपये २१,३४,११८/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. त्यातील अनुक्रमांक ४, ५ व ६ येथील कर्मचा-यांकडून काही रक्कम वसूल करण्यात येऊन उर्वरित रकमेची वसुली सुरू आहे व त्याबाबतची माहिती तक्त्यामध्ये दिली आहे.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात आधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.

जिल्हा परिषद गैरव्यवहार व अफरातफर प्रकरणाबाबत- सन २००८-२००९ सन २०१४-२०१५ या कालावधीमध्ये जिल्हा परिषदेमध्ये गैरव्यवहार तसेच अफरातफरीच्या प्रकरणांमध्ये किती रक्कम वसूल झालेली आहे व यामध्ये किती अधिकारी व कर्मचा-यांविरुद्ध कारवाई करण्यात आलेली आहे. यासंदर्भातील सखोल माहितीचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

१. **आनंदा सहकारी संस्था कोल्हापूर-** सद्यःस्थितीत श्री. आनंद विविध वस्तू उत्पादक व माल पुरवठा औद्योगिक संस्था, कोल्हापूर व आनंद सहकारी खाद्य विविध वस्तू उत्पादक व माल पुरवठा संस्था, कोल्हापूर यांचे विरुद्ध जिल्हा न्यायालयात वसुलीबाबत दिवाणी खटला सुरू आहे.

२. **श्री. अरुण काटकर, वरिष्ठ सहाय्यक (लेखा)-** सन २००७-०८ मध्ये जिल्हा परिषदेमध्ये अफरातफर व गैरव्यवहारामध्ये श्री. अरुण काटकर यांचेकडे अफरातफरातील एकूण गुंतलेली रक्कम रुपये ८,८५,०४७/- इतकी आहे. श्री.काटकर हे सध्या मयत असून त्यांचे दरमहाच्या कुटूंबनिवृत्तीवेतनामधून रक्कम रुपये ४०००/- प्रमाणे वसुली सुरू आहे. त्यानुसार माहे जून, २०१९ अखेर रक्कम रुपये ४,३४,३४८/- वसूल झालेली आहे. उर्वरित रक्कम रुपये ४,५०,६९९/- ही देय असणा-या कुटूंब निवृत्तीवेतनातून वसूल करणेची कार्यवाही ही पंचायत समिती स्तरावर दरमहा सुरू आहे.

**३. श्री. आर.आर.जाधव, कनिष्ठ सहाय्यक (लेखा)-** सन २००७-०८ मध्ये जिल्हा परिषदेमध्ये अफरातफर व गैरव्यवहारामध्ये श्री. आर.आर.जाधव, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांचेकडे अफरातफरातील एकूण गुंतलेली रक्कम रुपये १२,४५,३५९/- इतकी आहे. श्री. जाधव यांना मंजूर करणेत आलेल्या निवृत्तीवेतनातून रक्कम रुपये ३,०५०/- प्रमाणे वसूली सुरू असून माहे जून, २०१९ अखेर रक्कम रुपये ४,६०,५४५/- इतकी रक्कम वसूल केलेली आहे. उर्वरित रक्कम रुपये ७,८४,८३४/- वसुली मंजूर निवृत्तीवेतनातून वसूल करणेची कार्यवाही पंचायत समिती स्तरावर सुरू आहे.

**४. अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिका-** स्वयंसहाय्यता बचत गटामार्फत पुरविण्यात आलेल्या आहार देयकातून आर्थिक गैरव्यवहारात गुंतलेली प्राथमिक रक्कम ७,९८,५१७/- इतकी आहे. याबाबत स्थानिक निधी लेखा कार्यालयाकडे विशेष लेखा परिक्षण करणेबाबत पाठपुरावा करणेत आलेला असून सदर कार्यालयाकडून माहे ऑगस्ट- सप्टेंबर, २०१९ मध्ये विशेष लेखा परिक्षण करणेत येत असल्याबाबत जिल्हा परिषदेस कळविलेले आहे. त्यांचेकडून अपहाराची अंतिम रक्कम मिळताच कार्यवाही करण्यात येत आहे.

**५. श्री. कय्युम सय्यद मोमीन, कनिष्ठ लेखाधिकारी-** सन २०१२-१३ मध्ये जिल्हा परिषदेमध्ये अफरातफर व गैरव्यवहारामध्ये श्री. सय्यद मोमीन, यांचेकडे अफरातफरातील एकूण गुंतलेली रक्कम रुपये ११,९७,३०६/- इतकी आहे. श्री. सय्यद मोमीन हे सध्या मयत असून त्यांचे दरमहाच्या कुटूंबनिवृत्तीवेतनामधून रक्कम रुपये ५,०००/- प्रमाणे वसुली सुरू आहे. त्यानुसार माहे जून, २०१९ अखेर रक्कम रुपये ३,८०,१४०/- वसूल झालेली आहे. उर्वरित रक्कम रुपये ८,१७,१६६/- ही देय असणा-या कुटूंब निवृत्तीवेतनातून वसूल करणेची कार्यवाही ही पंचायत समिती स्तरावर दरमहा सुरू आहे.

**६. श्री.जगदीश नामदेव कांबळे, कनिष्ठ सहाय्यक-** श्री. जगदीश नामदेव कांबळे, निलंबीत कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र धामोड, ता. राधानगरी हे प्रा.आ. केंद्र धामोड कडील कामकाज हाताळीत असताना रक्कम रुपये ९,५९,८७५/- चा अपहार व रक्कम रुपये २२,९०,०९५ /- चा तात्पुरता अपहार केल्याचे प्राथमिक चौकशीत सिद्ध झाल्याने याबाबत त्यांच्या खाते निहाय चौकशीमध्ये त्यांच्या विरुद्ध ठेवण्यात आलेले आरोप सिद्ध झालेले आहेत. सदर अपहारीत रक्कमेच्या वसूलीसह श्री. कांबळे, कनिष्ठ सहाय्यक यांना दिनांक २८ जून, २०१९ च्या आदेशान्वये जिल्हा परिषद सेवेतून कमी करण्याची शिक्षा दिली आहे. तसेच त्यांच्या विरुद्ध फौजदारी गुन्ह्यांतर्गत दाखल न्यायालयीन दावा अद्याप न्यायप्रविष्ठ आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय-** (वित्त-७) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २४ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेतील गैरव्यवहार व अफरातफरीच्या प्रकरणी किती अधिकारी/कर्मचा-यांवर कारवाई करण्यात आली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, जिल्हा परिषदेमध्ये गैरव्यवहार व अफरातफरीबाबत एकूण सात मुद्दे होते. पहिला आणि दुसरा मुद्दा हा अंडी पुरवठ्यातील अपहाराबाबत होता. या प्रकरणी अंडी पुरवठा करणा-यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत प्रकरण सादर केले होते. परंतु उक्त दोन संस्थांविरुद्ध जिल्हा न्यायालयात वसुलीच्या बाबतीत दिवाणी खटला सुरू आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी येत्या दिनांक ३ ऑगस्ट, २०१९ रोजी आहे. उक्त दोन संस्थांकडून एकूण ५५ लाख रुपयांची वसुली करावयाची आहे. तिस-या व चौथ्या प्रकरणी कुटुंब निवृत्ती वेतनातून दरमहा वसुली सुरू आहे. पाचव्या प्रकरणाच्या बाबतीत माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१९ मध्ये विशेष लेखा परीक्षण करण्यात येणार आहे. सहाव्या प्रकरणातील कर्मचारी मयत झाले असून त्यांच्या कुटुंब निवृत्ती वेतनातून दरमहा वसुलीची कार्यवाही पंचायत समिती स्तरावर सुरू आहे.

समितीने विचारणा केली की, माननीय न्यायालयाच्या माध्यमातून जी वसुली करावयाची आहे त्यास न्यायालयाने स्थगिती दिली आहे काय ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नकारात्मक उत्तर दिले.

समितीने विचारणा केली की, समितीला वाटते सदर विषयाच्या अनुषंगाने (सब्जेक्ट टु कंडीशन) उक्त वसुली करण्यात यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, सध्या आमच्याकडे या संदर्भातील कोणतेही रेकॉर्ड उपलब्ध नाही. हे प्रकरण फौजदारी स्वरुपाचे असल्यामुळे संपूर्ण रेकॉर्ड पोलिसांकडे सादर केलेले आहे. येत्या दिनांक ३ ऑगस्ट, २०१९ रोजी या प्रकरणी माननीय न्यायालयात सुनावणी आहे. माननीय न्यायालयाने त्यावेळी याबाबत अंतिम निर्णय दिला तर चांगले होईल. सातव्या प्रकरणातील श्री. जगदीश कांबळे यांच्यावर ठेवण्यात आलेले आरोप सिद्ध झाल्यामुळे त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

## अभिप्राय व शिफारशी

कोल्हापूर जिल्हा परिषदेतंर्गत सन १९९६ ते सन २०१४ व सन २०१५ या कालावधीत गैरव्यवहार व अफरातफरीची एकूण ७ प्रकरणे घडली आहेत. आनंदा सहकारी संस्था, कोल्हापूर अंडी पुरवठा करणा-या या संस्थेकडून दोन प्रकरणामध्ये रुपये २,६१,८८१/- व रुपये ५२,६७,६१२/- इतकी रक्कम अद्यापही वसूल होणे बाकी आहे. जिल्हा न्यायालयात वसुलीसंदर्भातील खटला निर्णयाकरिता प्रलंबित आहे.

श्री. मारुती काटकर, वरिष्ठ सहायक लेखा अधिकारी यांनी रु. १२,४५,३५९/- इतक्या रकमेची अफरातफर केली आहे. त्यापैकी अद्यापही रु. ४,५०,६९९/- इतकी रक्कम वसूल होणे बाकी आहे. सदरहू व्यक्ती सन २०१६ मध्ये मयत झाली आहे. श्री. आर. आर. जाधव, कनिष्ठ सहायक (लेखा) यांचेकडून एकूण अफरातफरीची रक्कम रु. १२,४५,३५९/- पैकी अद्यापही रु. ७,८४,८३४/- इतकी वसुली प्रलंबित आहे. स्वसहाय्यता बचत गटांमार्फत पुरविण्यात आलेल्या आहार देयकासंदर्भातील गैरव्यवहाराची प्रथमदर्शनी रु. ७,९८,५१७/- इतकी ची अफरातफर झाली असल्याचे निदर्शनास आले असून अद्यापही अंतिम अपहाराची रक्कम निश्चित झालेली नाही.

श्री. कय्यूम सय्यद मोमीन, कनिष्ठ लेखाधिकारी यांनी रु. ११,९७,३०६/- इतक्या रकमेचा अपहार केला असून अद्यापही रु. ८,१७,१६६/- इतकी रक्कम वसूल करणे बाकी आहे. सदरहू व्यक्तीचे निधन झाले आहे. श्री. जगदीश कांबळे, कनिष्ठ सहायक यांनी रु. ९,५९,८७५/- इतक्या रकमेचा अपहार केला असून त्यांच्याकडून कोणतीही रक्कम वसूल झालेली नाही. या सर्व प्रकरणांमध्ये जिल्हा परिषदेच्या एकूण ९,३३,४०,५८४/- (रु. नऊ कोटी तेहत्तीस लक्ष चाळीस हजार पाचशे चौ-यांशी ) इतक्या रकमेचा अपहार झाला आहे. यामुळे जिल्हा परिषदेचे फार मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. अपहार झालेल्या प्रकरणामध्ये काही प्रमाणात वसुली झाली ही वस्तुस्थिती असली तरीही एवढ्या मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आल्याचे विचारात घेता जिल्हा परिषदेच्या प्रशासनातील मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह संबंधित वरिष्ठ नियंत्रक अधिकारी त्यांच्या जबाबदारीपासून वंचित राहू शकत नाही असे समितीचे अभिप्राय आहे. संबंधित अधिका-यांकडून एवढ्या मोठ्या प्रमाणात पैशाची अफरातफर होत असतांना तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिका-यांसह नियंत्रक अधिका-यांची भूमिका अतिशय संदिग्ध, संशयास्पद व कर्तव्यात कसूर करणारी आहे.

**कोल्हापूर जिल्हा परिषदेंतर्गत उक्त नमूद सर्व गैरव्यवहाराच्या प्रकरणांमध्ये अंतर्भूत प्रलंबित वसुली करण्यासंदर्भात उपलब्ध माध्यमातून तातडीने वसुली करण्यात यावी, तसेच अफरातफर व गैरव्यवहाराची प्रकरणे प्रलंबित राहू नये, तसेच अधिकारी व कर्मचा-यांकडून तातडीने थकीत रक्कम वसूल करण्यात यावी व या सर्व प्रकरणांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येऊन, दोषी आढळणा-या प्रकरणांशी निगडित तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच इतरही वरिष्ठ नियंत्रक अधिका-यांवर कठोर कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक ५ सप्टेंबर २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, कोल्हापूर**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(७) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(८) श्री. राहूल बोंद्रे, वि.स.स.

(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१०) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(११) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(१२) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(१४) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद पदाधिकारी :**

(१) श्रीमती शौमिका महाडीक, अध्यक्षा, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(२) श्री. सर्जेराव पाटील, उपाध्यक्षा, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(३) श्री. अंबरिषसिंह घाटगे, सभापती, अर्थ व शिक्षण समिती, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(४) श्रीमती वंदना मगदूम, सभापती, शिक्षण व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, कोल्हापूर

**स्थानिक निधी लेखा संचालनालय :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई :**

श्री. दि. बा. पाटील, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे :**

(१) श्री. संभाजी लांगोरे, उपायुक्त (आस्थापना) आयुक्त कार्यालय, पुणे

(२) श्री. विलास जाधव, सहायक आयुक्त (विकास), आयुक्त कार्यालय, पुणे

**जिल्हा परिषद, कोल्हापूर :**

(१) श्री. अमन मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. रवि शिवदास, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्रीमती सुषमा देसाई, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

(४) श्री. रविकांत अडसूळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) विभाग

(५) श्री. संजय राजमाने, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(६) श्री. आर. बी. भालेराव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(७) श्रीमती प्रियदर्शनी मोरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

(८) श्री. तुषार बुरूड, कार्यकारी अभियंता,(बांधकाम)

(९) डॉ. योगेश साळे, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१०) श्री. सोमनाथ रसाळ, महिला व बालविकास अधिकारी

(११) श्री. चंद्रकांत सुर्यवंशी, कृषि विकास अधिकारी

(१२) डॉ. एस. एम. शिंदे, पशुसंवर्धन अधिकारी

(१३) श्री. चंद्रकांत सुर्यवंशी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१४) श्री. मारूती बसर्गेकर, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा)

(१५) श्री. यशवंत थोरात, कार्यकारी अभियंता, जलसंधारण

(१६) श्री. भिमराव टोणपे, प्रतिनिधी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१७) श्री. रविकांत अडसूळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१८) श्रीमती एस. जे. जाधव, प्रभारी उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१९) श्री. राहूल कदम, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(२०) श्री. बाळासाहेब वाघ, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अजरा

(२१) श्रीमती माधुरी परीट, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भुदरगड

(२२) श्री. रमेश जोशी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चंदगड

(२३) श्रीमती सिमा जगताप, गट विकास अधिकारी पंचायत समिती, गडहिंग्लज

(२४) श्रीमती उमा पाटील, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गगनबावडा

(२५) श्री. अरविंद धरणगुत्तीकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले

(२६) श्रीमती डॉ. शबाना मोकाशी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कागल

(२७) श्री. सचिन घाटगे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर

(२८) श्री. तुलसीदास शिंदे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पन्हाळा

(२९) श्री. उदय पाटील गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राधानगरी

(३०) श्री. अनिल वाघमारे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शाहूवाडी

(३१) श्री. डॉ. विजयसिंह जाधव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरोळ

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील कोल्हापूर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक ६ सप्टेंबर २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, कोल्हापूर**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(३) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(४) डॉ सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(५) श्री. राहूल बोंद्रे, वि.स.स.

(६) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(७) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(८) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१०) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य** :

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(३) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय** :

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद, कोल्हापूर** :

(१) श्री. अमन मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. संजय राजमाने, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(३) श्री. रविकांत अडसूळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)

(४) श्री. आर. बी. भालेराव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) विभाग

(५) श्री. प्रियदर्शनी मोरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(६) डॉ. योगेश साळे, जिल्हा आरोग्य अधिकारी

(७) श्री. भिमराव टोणपे, प्रतिनिधी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(८) श्री. राहूल कदम, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(९) श्रीमती एस. जे. जाधव, प्रभारी उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१०) श्री. यशवंत थोरात, कार्यकारी, अभियंता, जलसंधारण

(११) डॉ. एस. एम. शिंदे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१२) श्री. मारूती बसर्गेकर, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(१३) श्रीमती सुषमा देसाई, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

(१४) श्री. चंद्रकांत सुर्यवंशी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१५) श्री. रवि शिवदास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(१६) श्री. चंद्रकांत सुर्यवंशी, कृषि विकास अधिकारी

(१७) श्री. रविंद्र चौगले, गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती

(१८) श्रीमती माधुरी परिट, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भूदरगड

(१९) श्री. बाळासाहेब वाघ, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आजरा

(२०) श्री. रमेश जोशी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चंदगड

(२१) श्रीमती सिमा जगताप, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गडहिंग्लज

(२२) श्रीमती उमा पाटील, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गगनबावडा

(२३) श्री. अरविंद धरणगुत्तीकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले

(२४) डॉ. शबाना मोकाशी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कागल

(२५) श्री. सचिन घाटगे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर

(२६) श्री. तुलशीदास शिंदे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पन्हाळा

(२७) श्री. उदय पाटील, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राधानगरी

(२८) श्री. अनिल वाघमारे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शाहूवाडी

(२९) श्री. डॉ. विजयसिंह जाधव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरोळ

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गट विकास अधिकारी यांची सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-२ संदर्भात कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

(शा.म.मु.) एचबी २४७८—५ (४५०-३-२०२१)

**शुक्रवार, दिनांक ०७ सप्टेंबर, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागह, कोल्हापूर**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(३) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(४) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(६) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(७) श्री. राहूल बोंद्रे, वि.स.स.

(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(९) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१०) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(११) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(१२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई :**

(१) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

(२) श्री. दि. बा. पाटील, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे :**

(१) श्री. संभाजी लांगोरे, उपायुक्त (आस्थापना) आयुक्त कार्यालय, पुणे

(२) श्री. विलास जाधव, सहायक आयुक्त (विकास) आयुक्त कार्यालय, पुणे

**जिल्हा परिषद, कोल्हापुर**

(१) श्री. अमन मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. रवि शिवदास, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्रीमती सुषमा देसाई, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

(४) श्री. रविकांत अडसूळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) विभाग

(५) श्री. संजय राजमाने, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(६) श्री. आर. बी. भालेराव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(७) श्रीमती प्रियदर्शनी मोरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

(८) श्री. तुषार बुरूड, कार्यकारी अभियंता,(बांधकाम)

(९) डॉ. योगेश साळे, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१०) श्री. सोमनाथ रसाळ, महिला व बालविकास अधिकारी

(११) श्री. चंद्रकांत सुर्यवंशी, कृषि विकास अधिकारी

(१२) डॉ. एस.एम. शिंदे, पशुसंवर्धन अधिकारी

(१३) श्री. चंद्रकांत सुर्यवंशी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१४) श्री. मारूती बसर्गेकर, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा)

(१५) श्री. यशवंत थोरात, कार्यकारी अभियंता, जलसंधारण

(१६) श्री. भिमराव टोणपे, प्रतिनिधी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१७) श्री. रविकांत अडसूळ, शिक्षणाधिकारी ( प्राथमिक)

(१८) श्रीमती एस. जे. जाधव, प्रभारी उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१९) श्री. राहूल कदम, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(२०) श्री. बाळासाहेब वाघ, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अजरा

(२१) श्रीमती माधुरी परीट, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भुदरगड

(२२) श्री. रमेश जोशी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चंदगड

(२३) श्रीमती सिमा जगताप, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गडहिंग्लज

(२४) श्रीमती उमा पाटील, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गगनबावडा

(२५) श्री. अरविंद धरणगुत्तीकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले

(२६) श्रीमती डॉ. शबाना मोकाशी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कागल

(२७) श्री. सचिन घाटगे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर

(२८) श्री. तुलसीदास शिंदे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पन्हाळा

(२९) श्री. उदय पाटील/गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राधानगरी

(३०) श्री. अनिल वाघमारे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शाहूवाडी

(३१) श्री. डॉ. विजयसिंह जाधव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरोळ.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांनी सन २०१३-१४ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील कोल्हापूर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २४ जुलै, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई :**

श्री. सु. रा. भोसले, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, महसूल

(२) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

(३) डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(४) श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग

(५) श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग

(६) श्री. अनिल डिग्गीकर, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग

(७) श्री. पी. के. मिराजे, सहायक सचिव (तांत्रिक) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई

(८) श्री. म. रा. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(९) डॉ. व्ही. पी. भुंदेवाड, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

(१०) श्री. भा. ज. गाडेकर उप सचिव, पशुसंवर्धन विभाग

(११) डॉ. वसंत माने, अवर सचिव, ग्रामविकास विभाग

(१२) श्री. एस. व्ही. गायकवाड, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग

(१३) श्री. शरद यादव, कार्यासन अधिकारी, ग्राम विकास विभाग

(१४) श्री. र. पु. इंगोले, कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग

(१५) श्री. अ. म. पिंपरकर, श. श्रे. १, पर्यावरण विभाग

**जिल्हा परिषद, कोल्हापूर :**

(१) श्री. अमन मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(२) श्री. रविकांत अडसूळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, कोल्हापूर

(३) श्री. संजय माने, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(४) श्री. राजेंद्र भालेराव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर

(५) श्री. सोमनाथ रसाळ, महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(६) श्रीमती आशा उबाळे, शिक्षणाधिकारी, (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर

(७) श्री. मनिष पवार, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(८) डॉ. वाय. आर. साळे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(९) डॉ. विनोद पवार, पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(१०) श्री. समीर व्याघ्रांबरे, प्र. उद्यान अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१३-१४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, वित्त विभाग, सहायक सचिव, (तांत्रिक) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, सहसचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, महिला व बालविकास विभाग, सहसंचालक, आरोग्य सेवा संचालनालय, उप निबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त कार्यालय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १३ ऑगस्ट, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, नवी मुंबई :**

श्री. सु. रा. भोसले, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, महसूल

(२) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

(३) डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(४) श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग

(५) श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग

(६) श्री. अनिल डिग्रीकर, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग

(७) श्री. पी. के. मिराजे, सहाय्यक सचिव(तांत्रिक) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई

(८) श्री. म. रा. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(९) डॉ. व्ही. पी. भुंदेवाड, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय मुंबई

(१०) श्री. भा. ज. गाडेकर उप सचिव, पशुसंवर्धन विभाग

(११) डॉ. वसंत माने, अवर सचिव ग्रामविकास विभाग

(१२) श्री. एस. व्ही. गायकवाड, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग

(१३) श्री. शरद यादव, कार्यासन अधिकारी, ग्रामविकास विभाग

(१४) श्री. र. पु. इंगोले, कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग

(१५) श्री. अ. म. पिंपरकर, श श्रे. १, पर्यावरण विभाग

**जिल्हा परिषद, कोल्हापूर :**

(१) श्री. अमन मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(२) श्री. रविकांत अडसूळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, कोल्हापूर

(३) श्री. संजय माने, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, कोल्हापूर

(४) श्री. राजेंद्र भालेराव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर

(५) श्री. सोमनाथ रसाळ, महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(६) श्रीमती आशा उबाळे, शिक्षणाधिकारी, (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर

(७) श्री. मनिष पवार, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(८) डॉ. वाय. आर. साळे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(९) डॉ. विनोद पवार, पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

(१०) श्री. समीर व्याघ्रांबरे, प्र. उद्यान अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१३-१४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात कोल्हापूर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, वित्त विभाग, सहायक सचिव, (तांत्रिक) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, महिला व बालविकास विभाग, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, उपनिबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त कार्यालय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांची साक्ष घेतली.

## बैठकीचे कार्यवृत्त

पंचायत राज समिती (Panchayati Raj Samiti) ची बैठक बुधवार, दिनांक ०३ मार्च, २०२१ रोजी ३-०० वाजता, विसावा मजला, कक्ष क्र. २००१, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(३) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(४) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(५) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(६) श्री. माधवराव जवळगावकर पाटील, वि.स.स.

(७) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(८) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(९) श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, वि.स.स.

(१०) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

**विशेष निमंत्रित सदस्य**

(१) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

(४) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने बैठकीत चौथ्या अहवालाच्या प्रारूपावर विचार करून किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई